

गूढ
काळोख्याची
रात्र
प्राजक्ता देशपांडे

# गूढ काळोखाची रात्र

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत. सूचना. टीका. विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गूढ काळोखाची रात्र

कथासंग्रह

प्राजक्ता संजयकुमार देशपांडे

**मनमोही**

ई साहित्य प्रतिष्ठान

# गूढ काळोखाची रात्र (कथासंग्रह)

प्राजक्ता संजयकुमार देशपांडे ( **मनमोही** )

मो. नं: 9960378297

e- mail id : deshpandeps97@gmail. com

insta account : the_soul_of_writer_

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary. dramatic. musical. sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction. damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ११ एप्रिल २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत

नमस्कार,

पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर तुमचा प्रतिसाद आणि अभिप्राय पाहून आता मी माझं दुसरं पुस्तक तुमच्या भेटीला घेऊन येत आहे. तुम्ही भरभरून केलेले कौतुक पाहून खरंच मला खुप आनंद झाला आहे.

देव पटवर्धन हे पात्र तुम्हाला आवडणार याची मला खात्री आहे. वेगवेगळ्या केसेस सोडवताना त्याला मिळणारा आनंद पाहून तुम्हालाही नक्कीच आनंद होईल. तुम्ही माझ्या पहिल्या पुस्तकाला जे प्रेम दिले तसेच किंबहुना त्याहून जास्त प्रेम या पुस्तकाला मिळेल अशी आशा करते.

इ- साहित्य टीम मुळे माझ्या कलागुणांना वाव मिळाला म्हणून मी त्यांची खुप आभारी आहे. मला नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या कुटुंबाचे आणि मित्र मंडळींचेही खुप खुप आभार.

तुमच्या प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत.



- मनमोही ( प्राजक्ता देशपांडे )

या पुस्तकाच्या लेखिका प्राजक्ता संजयकुमार देशपांडे सिविल इंजीनियर पदवीधर आणि M. E. structure च्या विद्यार्थिनी आहेत. वाचन हा त्यांचा लहानपणापासूनचा छंद. त्यांच्या वडिलांकडून तो जणू वारसाहक्कानेच मिळालेला आणि नंतर लिखाणसुद्धा. त्यांचे वाचन अफ़ाट आहे. मोठंमोठ्या कादंबऱ्याही त्यांनी अगदी एका दिवसात वाचून पूर्ण केल्यात. सुहास शिरवळकर, शरदचंद्र वाळिम्बे, व. पु. काळे, सुधा मूर्ति असे वेगवेगळया धाटणीचे लेखक त्यांचे प्रेरणास्थान आहेत. आणि इंजीनियरिंगनेही त्यांना बरेच काही शिकवले असे म्हणायला हरकत नाही.

त्यांच्या कथेवर आपली मते वाचक त्यांना खालील पत्त्यांवर कळवू शकतात.

संपर्क :


प्राजक्ता संजयकुमार देशपांडे ( मनमोही )

मो. नं: 9960378297

e- mail id : deshpandeps97@gmail. com

insta account : the_soul_of_writer_

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manpakharu_prajakta_deshpande.pdf

मनपाखरु हे खुप चांगले पुस्तक आहे.

- अभिजीत आंदे

खुपचं छान पुस्तक आहे प्राजक्ता. अशीच लिहित रहा.

- स्वराली देशपांडे

मनपाखरु, तुमचे लेखन खुप छान होते. मला खुप आवडले. असेच लिहित रहा.

- सुनील घाघ




तुझे लिखाण नेहमीच मनाला भिडते. अशीच लिहित रहा.

- सौरभ शुक्ला

मनपाखरू, हे पुस्तक मी वाचले. त्यातील कुटुंब ही कथा मला खुप आवडली.

- शंकर मुक्कावार

तुझे पुस्तक खुप आवडले. तुला पुढच्या प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा.

- महेश व्यापारी

तुमचे पुस्तक वाचले. खुप सुंदर लेखन केले आहे. भावी लेखन कलेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

- विश्वेश पत्की

आपलं मन पाखरू हे पुस्तक esahity वरून वाचलं. खुप छान कथा आहेत. एखादी भयकथा जरूर लिहावित🙏

- आदित्य तोडकर

# प्रस्तावना

नमस्कार,

मनपाखरू नंतर आता गूढ काळोखाची रात्र हे लेखिकेचे दूसरे पुस्तक आहे. लेखिका माझी मुलगी असल्यामुळे मला तिच्या लेखनाबद्दल प्रेम असणे स्वाभाविक आहे. पण एक वाचक म्हणूनही नव्या पीढीचे लेखन मला खुप आवडले आहे.

दोन्ही कथा खुपच सुंदर पद्धतीने दर्शवल्या आहेत. या पुस्तकातील पात्रे विशेषतः देव पटवर्धन आपले मन आकर्षित करून घेते. तुम्हालाही हे पुस्तक आवडेल यात मला शंका नाही. आपल्याला पुस्तक आवडल्यास लेखिकेला प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात, अशी मी तुम्हाला विनंती करतो.

लेखन करण्याचे माझे स्वप्न माझी मुलगी पूर्णत्वास नेत आहे, हे पाहून मला खुप आनंद होत आहे. मला आणि आमच्या संपूर्ण कुटुंबाला तिचा अभिमान वाटतो. तिच्या लेखन प्रवासाला माझ्या खुप खुप शुभेच्छा.

- श्री. संजयकुमार देशपांडे.

पाटलांचं घराणं म्हणजे गर्भश्रीमंतीचं उत्तम उदाहरण. पिढीजातच सगळ्यांना श्रीमंतीचा वारसा मिळालेला. अप्पासाहेब पाटलांचे खापरपणजोबा दादासाहेब, यांच्याकडून तर तत्कालीन इंग्रज पण मदत मागायचे म्हणे. एवढं तालेवार आणि तितकाच गूढ इतिहास असलेलं हे घराणं. पाटलांच्या एकुण एक सगळ्या सुना देखील अशाच उच्चभ्रू कुटुंबातील होत्या. फक्त वाड्यातल्याच नाही तर गावाच्या इतिहासातही या घराण्याचे योगदान होते.

अप्पासाहेब यांची पत्नी रुक्मिणीताई म्हणजेच सगळ्यांच्या रख्माअक्का, यांनीही गावातील स्त्रियांसाठी पुढाकार घेऊन शिक्षण, नौकरी, स्वाभिमान, आरोग्य ह्या आणि अशा बऱ्याच मुलभुत आणि हक्काच्या गोष्टींसाठी लढा दिला. तर असं हे पाटील घराणं.

आज वाड्याच्या आनंदाचा ठावठिकाणाच नव्हता. एवढा मोठा बुरुजांचा वाडा. वीस बाविस खोल्या, समोर मोठं पटांगण, वाड्यात प्रवेश केल्यावर मध्यभागी दिसणारे सुंदर असे संगमरवरी तुळशी वृंदावन, उजव्या बाजूला मोठा हौद, त्याच्या बाजूला चाफा, कन्हेरी, मोगऱ्याची झाडे त्यामुळे व्हरांड्यात पसरलेला सुगंध, डाव्या बाजूला बसण्यासाठी तैयार केलेली बैठक, असा हा भव्य वाड़ा. सजवायला काढायचा म्हणलं तरी दोन तीन दिवस लागतील. पण वाड्यात 15- 20 नोकर होते. आणि सकाळपासूनच कामाची गडबड चालली होती. एव्हाना वाडा सुंदर सजवून तयार होता, जणु आज दिवाळीचाच दिवस.

होय, खरंच रख्माअक्कासाठी तरी आज दिवाळीच होती. त्यांचा अरविंद 4 वर्षांनंतर अमेरिकेवरून शिक्षण संपवून आज येणार होता. महिन्याभरापासून जय्यत तयारी चालु होती. वाड्याची सजावट, गोडाधोडाचे पदार्थ सगळं काही तयार होतं. आणि आता सगळा वाडा फक्त अरविंदची वाट पाहत होता. अवंतिकाही खुप आतुरतेने वाड्याच्या दरवाज्याकडे डोळे लावून होती.

अवंतिका म्हणजे आप्पासाहेबांचे मित्र आणि वाडयाचे मुन्शी गंगाधरराव यांची मुलगी. दिसायला खुपच सुंदर, सात्विक , वडिलांसारखी कामात हुशार आणि तल्लख बुद्धिची पण

निर्मळ मनाची. लहानपणीच आई देवाघरी निघून गेल्यामुळे तिचा सगळा वेळ वडिलांसोबतच जायचा. त्यामुळे लहानपणापासूनच तिचा वाड्यावरचा वावर हा नेहमीचाच.

गंगाधरराव सुद्धा पाटलांना घरातीलच व्यक्ती. पण दुर्दैवाने तेही लवकरच स्वर्गवासी झाले. त्यामुळे गंगाधररावांच्या पश्चात अवंतिका आणि तिचा भाऊ सर्वेश दोघांचीही पालकत्वाची जबाबदारी साहजिक आप्पासाहेबांवर आली. त्या दोघांचं पालनपोषण आणि शिक्षण कशामधेही त्यांनी कसर सोडली नाही. अवंतिका सर्वेशपेक्षा मोठी होती. जेमतेम अरविंदच्याच वयाची. त्यामुळे तिचं शिक्षण आटोपूनही आता 2 वर्षे होत आली होती पण एकूणच तिच्यावरच्या प्रेमापोटी तिला लग्न करून दुसरीकडे पाठवण्याचा विचार मात्र आप्पासाहेब आणि रख्माअक्काना सहन होत नव्हता आणि म्हणूनच त्यांनी तिचं लग्न अरविंदसोबत ठरवून द्यायचं मनाशी पक्कं केलं. अरविंद शिक्षण पूर्ण करून आल्यावर या दोघांचं लग्न लावून द्यायचा विचार ते करत होते. रख्माअक्कानी तर उत्साहाच्या भरात ही गोष्ट अवंतिकाच्या कानावरही घातली आणि तिनेही लाजून त्याला समंती दर्शवली. ही आनंदाची बातमी अवंतिकाने लगेच सर्वेशला फोन वरून कळवली. सर्वेश अजूनही शिक्षणासाठी कोल्हापुरात होता, त्यालाही हे ऐकून खुप आनंद झाला होता. अवंतिकापेक्षा लहान असला तरी बरीच समज होती त्याला. खुप भावनिक होता तो. लहानपणापासून अवंतिकाचं अरविंदवर प्रेम होतं, ही गोष्ट फक्त सर्वेशलाच माहिती होती पण त्यांची एकूण परिस्थिती लक्षात घेता ह्या बद्दल त्याने कधी अवंतिकाशी चर्चा केली नव्हती. पण आता स्वतः अप्पासाहेबानी हा निर्णय सांगितला हे ऐकून त्याला त्यांच्या विषयीचा वाटणारा आदर निश्चितच वाढला होता.

सकाळपासून अरविंदची वाट पाहून सगळा वाड़ा आता थकला होता. एरवी सगळ्यांना संयमाने वागा असं सांगणाऱ्या रख्माअक्का आज मात्र अगदी लहान मुलाप्रमाणे अरविंद कधी येणार?, गाडी अजून कशी नाही आली ?आणखी किती वेळ वाट पाहायची? असे शंभर प्रश्न विचारून अप्पाना भंडावून सोडत होत्या. शेवटी अरविंदला आणण्यासाठी गेलेली गाडी दारात येऊन उभी राहिली आणि दारात एवढ्या वेळ स्वागतासाठी थांबलेल्या माणसांनी उत्साहाने ढोल ताशे वाजवण्यास सुरुवात केली.

गाडीतून अरविंद उतरला तसा वाड्याच्या पहिल्या मजल्यावरच्या बालकनीतून फुलांचा वर्षाव झाला. औक्षण करण्यासाठी आणि दृष्ट काढण्यासाठी अक्का आणि अवंतिका ताट घेऊन दारात उभ्या होत्या. 4 वर्षांनंतर आज त्यांच्या समोर निळी जीन्स आणि पांढरा टी शर्ट घातलेला, देखणा, एखाद्या मालिकेतील हीरोला लाजवेल अशी मस्त केस आणि दाढीची स्टाइल असणारा अरविंद उभा होता.

कितीतरी वेळ त्या दोघींनी त्याला निरखून पाहण्यात घातला आणि मग अक्का त्याला औक्षण करण्यासाठी पुढे आल्या. एव्हाना ढोल ताशांचा गजर ऐकून सगळीच मंडळी आली होती. तेवढ्यात औक्षण करणाऱ्या अक्काना थांबवत अरविंदने गाडीकडे पाहून ड्राईवरला इशारा केला आणि त्या ड्राईवरने गाडीच्या दुसऱ्या बाजूचे दार उघडले. आतून एक मुलगी बाहेर आली. पांढरा शुभ्र स्लीव्हलेस कुर्ता तशीच पांढरी सलवार आणि त्यावर अरविंदच्या जिन्सला मैच करेल अशी निळी ओढनी, खुपच सुंदर होती ती दिसायला!

गोरी पान, घारे डोळे तिला पाहून सगळेच थोडेसे दचकले.

अरविंदनी ओळख करून दिली, "ही संध्या, माझ्यासोबत अमेरिकेत होती. तिला आपलं गाव दाखवण्यासाठी घेऊन आलो आहे. "

तिचंही जंगी स्वागत करण्यात आलं.

स्वागत समारोह , जेवणे वगैरे झाल्यानंतर सगळेच दिवाणखान्यात गप्पा मारत होते. आतापर्यंत संध्या आणि अवंतिकाही एकमेकांत मिसळून गप्पा मारण्यात रममाण झाल्या होत्या. गावात राहूनसुद्धा अवंतिकाची हुशारी आणि तिला असणारी बाकीची साहित्य, कला आणि ऐतिहासिक माहिती पाहून संध्याला तिचं खुप कौतुक वाटलं. अमेरिकेत वाढलेली असूनही संध्याचे संस्कार पाहून अक्कानी तिची प्रशंसा केली. तिच्याबद्दल आणखी जाणून घ्यायची त्यांची उत्सुकता आता वाढत होती. संध्यानी ती अनाथ असल्याचं सांगितलं. लहान असताना अनाथ आश्रमातून दत्तक घेऊन तिला अमेरिकेत नेऊन, प्रेम आणि शिक्षण देणाऱ्या आई वडिलांचंही 2 वर्षांपूर्वी अपघातात निधन झालं, हे सांगताना तिच्या डोळ्यातून अश्रुंनी तिच्या दुःखाला वाट मोकळी करून दिली. रख्माअक्काच्या कुशीत संध्याने स्वतःला झोकून दिले. गप्पाना मिळालेलं वेगळं वळण पाहून अरविंदने थेट विषयाला हात घातला आणि संध्यासोबत लग्न करण्याची इच्छा अक्कासमोर सांगितली. इतका वेळ खुर्चीत बसून पेपर वाचणारे अप्पा हे ऐकून खुपच भडकले. त्यांचा राग अनावर झाला. काही समजावून सांगण्याआधीच त्यांनी विरोध दर्शवला.

"अप्पा , अहो तुम्ही थोडं शांत रहा, पोरगा आताच तर घरी आला आहे. आल्या आल्या त्याच्यावर असं... '' अक्काचं बोलण तोडत अप्पा आणखी चिडून म्हणाले,

" शांत राहु?? अगं इथे आपण तर स्वप्न पाहिलीच ह्या गाढवासाठी. पण त्या निरागस पोरीलाही दाखवली, आपलंच चुकलं. आपण त्याचं लग्न अवंतीशी ठरवलं. आता शेवटचं सांग विंदा, तू अवंतिकाशी लग्न करणार की नाही???"

" अप्पा, अहो तुम्ही असं परस्पर कसं ठरवलं? मी आणि अवंती लहानपणापासून फक्त मित्र आहोत आणि संध्यावर माझं खुप प्रेम आहे. तिचं या जगात माझ्याशिवाय दूसरं कोणी नाही. अवंतीला काय दूसरा चांगला मुलगा मि... "

"गप्प बस तिचं काय करायचं ते मला सांगू नकोस. ह्या घरात माझ्या शब्दाला किंमत म्हणून नाही , करा स्वतःची मनमर्जी "

असं म्हणून अप्पा निघून गेले.

अप्पा कुठे गेले हे कोणालाही माहिती नव्हतं. अप्पा रागीट स्वभावाचे होते हे तर साऱ्या गावाला ठाऊक होतं पण आजवर ते कधी असं कोणाला न सांगता निघून गेले नव्हते. आता 2 दिवस उलटून गेले, आता मात्र कहर झाला होता. नोकर माणसांकडून ही बातमी हळू हळू गावात पसरली. मारुतीच्या पारावर म्हाताऱ्या - कोताऱ्याना चर्चेला विषय मिळाला. घरची मंडळीही आता जास्तच काळजीमधे पडली. सगळ्यात जास्त अडचण तर संध्याची झाली, तिला काहीच कल्पना नसताना हे प्रकरण बरच लांबलं आणि ह्या 2- 3 दिवसात अवंतिकाच्या समोर जाण्याचे धाडसही ती करू शकत नव्हती.

शेवटी चौथ्या दिवशी अप्पा आले, ते खुपच शांत वाटत होते. अप्पा आले त्याच दिवशी संध्याकाळी सर्वेशही कोल्हापुरवरून आला होता. आता अप्पाचा राग तसा कमी वाटत होता. सर्वेश सोबत तर ते काही घडलंच नाही असे वागत होते, हे पाहून सगळ्यांना हायसे वाटले. 10 वाजता रात्रीची जेवणं उरकल्यावर अप्पानी व्हरांड्यात अवंती आणि सर्वेशला बोलवून घेतलं. काही वेळ शांततेत गेल्यावर अप्पानी बोलायला सुरुवात केली.

" अवंती बाळा, माझी खरंच मनापासून तुझी माफी मागायची इच्छा आहे.....

" अहो अप्पा तुम्ही हे.... ''

" नाही मला अडवु नको, मला बोलू दे. मी आणि अक्का तुझे गुन्हेगार आहोत. आम्ही दोघांनी तुला अशी स्वप्नं दाखवली जी सत्यात उतरवणे आमच्या हातात नव्हते. खरं म्हणजे ते आमच्याही लक्षात आलं नाही. मी खुप विचार केला. आज मी चिडून रडून तुझं लग्न अरविंद सोबत लावूनही देईन पण तो तुला कितपत सुखात ठेवेल मला माहिती नाही. त्याचं प्रेम संध्यावर आहे. आणि जसं एखाद्याला आपण प्रेम करायला भाग पाडु शकत नाही तसंच

कोणाच्या प्रेमाला आपण बांध घालू शकत नाही. तशी ती मुलगी चांगली आहे पण तुझ्यावर अन्याय मी नाही होऊ देणार तू म्हणत असशील तर...... "

" नाही अप्पा, अहो दुसऱ्याचे प्रेम मिळवून का मी सुखी होईल ? आणि मीही अरविंदला मित्रच मानते. तुमच्या आनंदातच माझा आनंद आहे आणि मला माहिती तुमचा आनंद अरविंदच्या आनंदात. म्हणून तुम्ही निश्चिंत रहा. काही अन्याय वगेरे नाही झाला माझ्यावर, हो की नाही रे सर्वेश.... "

सर्वेशच्या मनाची अवस्था अवंतीचा विचार करून आधीच वाईट होती आणि आता अवंतीच्या बोलण्याने तर उरली सुरली आस पण सोडून द्यावी लागणार होती. तिच्या होकाराला संमती दर्शवून त्याने डोळ्यातले पाणी लपवले. आणि सगळे झोपायला निघून गेले.

पण त्यादिवशी रात्री 12 वाजता अरविंदने अक्कासोबत बोलत असताना लग्नानंतर अमेरिकेला जाणार आणि तिथेच नोकरी करणार म्हणून सांगितलं आणि हे ऐकून अप्पाच्या उतरलेल्या रागाने आणखी एकदा रौद्ररूप धारण केलं. जवळ जवळ 2 पर्यंत भांडणे चालली. जवळ असणाऱ्या खोल्यांमधून भांडणे पाहणारी नोकर मंडळीही घाबरली होती. थोड्यावेळात वातावरण शांत झालं आणि मग हताश होऊन अप्पा आणि अक्का झोपायला निघून गेले. अरविंद आणि संध्याही मग आपापल्या खोलीमधे निघून गेले.

गावाकडील सकाळ म्हणजे खरंच अनुभव घेण्यासारखी असते. सुंदर वातावरण, चिमण्यांचा चिवचिवाट, सोनेरी किरणांनी न्हावून निघालेली फुलांची झाडे. सकाळच्या वातावरणात वाडा अगदी प्रसन्न वाटत होता पण फक्त काही वेळासाठीच....

काळजाला भेदून जाणाऱ्या त्या कींकाळी नंतर ह्या वाड्यावर संकटांचे आणि दुःखाचे काळे ढग दाटुन येणार होते. सकाळी 7 वाजता दूध घेऊन येणाऱ्या शेवंताच्या त्या किंकाळीने

सगळा वाडा हादरला. व्हरांड्यात संध्या रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. कालपर्यन्त गोरीपान आणि सुंदर दिसणाऱ्या संध्याचा चेहरा आज काळा निळा झाला होता.

मंगळसूत्र गळ्यात बांधण्याची स्वप्न होती, त्याच्या जागी आज एक भला मोठा दोरखंड होता. हळू हळू आता सगळी नोकर मंडळी आणि घरातील माणसे जमली होती. घरातले काही सामानही विखुरलेले दिसत होते, घरातील सोनेनाणे पैसे, कपडेही चोरीला गेल्याचे दिसत होते. एवढी सगळी माणसे घरात असताना घरात दरोडा आणि ख़ून झाला याचे गावकऱ्यांना खुप आश्चर्य वाटत होते पण घरातल्या सगळ्याच माणसांवर गुंगीच्या औषधाचा परिणाम होता. म्हणून तर शेवंता आली तोपर्यंत कोणीही उठलेले नव्हते. काही नोकरमंडळी तर गाव गोळा झाल्यावर शुद्धिवर आली.

एव्हाना पोलीसपण वाड्यात आलेले होते. पंचनामा आणि हवी असलेली माहिती गोळा करत होते. फिरतीवर गेलेल्या हवालदारांना मागच्या शेतामधे दरोड्याचा माल सापडला, कुत्रा मागे लागल्यामुळे चोरांनी तो तिथेच टाकून पळून जाण्याची शक्यता पोलिसांना वाटत होती. अरविंदची अवस्था तर सगळ्यात वाईट होती, काय काय स्वप्न दाखवून, किती तरी सुखात ठेवण्यासाठी त्याने संध्याला इथे आणलं होतं आणि हे काय भलतंच झालं. चोरीचा माल तपासून तो याच घरातील आहे का याची खात्री झाल्यावर तो पोलिसांनी नोंद करून परत केला. पण संध्याच्या मृत्युचे काही त्यांना धागेदोरे मिळत नव्हते. ज्या अर्थी चोरांनी गुंगीचे औषध फवारले होते त्या अर्थी कोणाला मारण्याचा त्यांचा हेतूच नव्हता पण मग संध्याचा मृत्यु नेमका झाला कसा ?????

काल याच वाड्यात दिवाळी वाटेल इतका उत्साह आणि आनंद होता आणि आज मात्र त्याहीपेक्षा जास्त निराशा आणि दुःख. सहवास नसला तरी हसत खेळत असलेल्या एका व्यक्तीला आपण काल पाहतो आणि आज तीच व्यक्ती आपल्यासमोर अशी निपचित पडलेली असेल तर जीव कसा कासाविस होतो, याचा अनुभव घरातील सगळे घेत होते.

ही केस इंस्पेक्टर जाधव यांच्याकडे होती. कोणतीही केस ते 4 दिवसांच्या आतच सोडवत, असा त्यांचा लौकिक होता आणि आज 2 रा दिवस होता म्हणूनच आता ते याच विचारात होते.

" संध्याचा खून झाला होता, हे तर नक्की होतं आणि तेही गळा दोरखंडाने आवळून पण मग तिच्या डोक्यावर झालेली जबर जखम याचा गुंता काही केल्या सूटत नव्हता. पोस्टमार्टम नुसार आधी तिच्या डोक्याला जखम झाली असेल आणि नंतर तिचा गळा दाबला गेला. पण

जर चोराला चोरीच करायची होती आणि आपण असा अंदाज बांधला की संध्या पाणी पिण्यासाठी तिथे आली आणि चोराने तिला पाहून मागून जोरात धक्का दिला आणि ती खाली डोक्यावर पडली. पण तिला लागलेली जखम पाहता ती त्या क्षणी बेशुद्ध झाली असेल आणि मागून धक्का दिला असल्या कारणाने तिने चोराला पाहिलंही नसेल. मग चोराने तिला गळा आवळून मारण्याचे काय कारण असेल????

आणि आपण असं गृहीत धरलं की तिने चोराला पाहिलंही असेल पण कोणताही चोर मुखवटा बांधल्याखेरीज चोरी करत नाही आणि जे चोर आपला चेहरा लपवत नाहीत त्यांना तर तिला मारण्याचे काही कारणच नाही. ही केस फक्त चोरीची नाही वाटत. कुठे तरी पाणी नक्कीच मुरत आहे "

" काय मग हवालदार शिंदे काही चौकशी केली की नाही की फक्त वाडाच पाहत होता"

" काय जाधव साहेब , तुमच्या सोबत काम करायचं म्हणजे आम्हालाही कान आणि डोळे उघडे ठेवावे लागतात. छोट्या छोट्या गोष्टींकडेसुद्धा कानाडोळा करून नाही चालत"

" पुरे... काही माहिती असेल तर ते सांगा. मग बघू, तुमचा कौतुक सोहळा करायचा की नाही"

" हो सांगतो की , अहो त्या संध्या मैडम अमेरिकेहून काल अरविंद साहेबांबरोबर आल्या होत्या, ते काही गाव बघायला नाही तर लग्न करायला आणि म्हणे अप्पाना ते बिलकुल आवडलं नव्हतं, खुप भांडण झालं म्हणे. घरच्या नोकरांनी एवढा राग नव्हता पाहिला म्हणे या आधी अप्पाचा. "

"असं... आणखी काय "

"अहो खरी गोष्ट तर पुढेच आहे, 2 दिवस कोणालाही न सांगता गेले होते म्हणे ते निघून आणि आल्यानंतरही पहाटे 2 पर्यन्त भांडण झालं म्हणे ते पुन्हा अमेरिकेला जाणार म्हणून..."

"कारण तर आहे शिंदे पण पुराव्याचं काय म्हणे ?????"

" काय साहेब तुम्ही पण.. गरीबाची कसली थट्टा करता, फोरेंसिक रिपोर्ट आले की बघू काही मिळतंय का ते "

" या या वाघमारे !!आणले का फोरेंसिक रिपोर्ट्स???" इंस्पेक्टर जाधव.

"हो , आणले आहेत. एक विशेष बाब आहे, संध्याच्या कपडयांमधे आम्हाला एक सोन्याची चेन मिळाली आहे. त्यावर बाकी कोणाचेच हाताचे ठसे मैच होत नाहीत. संध्याचेही नाही पण... "

"पण काय?? बोला लवकर वाघमारे "

"पण अप्पाच्या हाताचे ठसे मैच होतात"

"काय?? मग पाहत काय बसलाय, चला वारंट घेऊन अटक करायला"

"हो पण साहेब त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा इतिहास पाहता ते असं काही करतील अस नाहीं वाटत"

"वाघमारे अहो, शेवटी माणूसच की तोही, त्यालाही भावना आहेतच, मन आहेच, त्यापायी लोक काहीही करू शकतात आणि आपल्याजवळ पुरावा आहे. नाइलाज असला तरी ताब्यात घ्यावे लागेल. चला आता लवकर, दरोडयाचं बघू नंतर आधी खुनाचं बघू"

इंस्पेक्टर जाधव आणि फौज वाडयाच्या दिशेने निघाले. वाड्यात पाऊल ठेवल्यानंतर त्यांनी अरविंदला बाकी जुजबी गोष्टींची विचारणा केली आणि त्या नंतर इथे येण्याचे मुख्य कारण सांगितले.

" इंस्पेक्टर, तुम्हाला या गावात येऊन किती दिवस झाले? आमच्या अप्पाना ओळखत नसाल तर जरा गावात एक चक्कर मारून या. गावकरी अगदी भरभरून सांगतील तुम्हाला अप्पाबद्दल. अहो, कोणावरही आळ घेण्याआधी त्याची शहानिशा करून घ्या"

" हे बघा मिस्टर अरविंद, मला माझं काम शिकवु नका. ते तुमचे वडील आहेत, तुम्हाला धक्का बसणे साहजिक आहे पण माझ्याकडे पुरावा आहे आणि म्हणूनच मला वारंटही मिळाला आहे. माझा अगदीच नाइलाज आहे. मला अप्पाना अटक करावीच लागेल "

बघता बघता हे प्रकरण आता वेगळंच वळण घेत होतं. गावातील प्रश्न सोडवणाऱ्या अप्पाना आता ह्यातून कोण सोडवणार हे सांगणे कठीण होते. त्यांना यातून निर्विवादपणे सोडवेल असा कोणी तरी वकील हवा होता.

अरविंदला तर काही सुचेनासं झालं होतं एकीकडे संध्याच्या आठवणी त्याला त्रास देत होत्या तर दूसरीकडे अप्पाची काळजी त्याला स्वस्थ बसु देत नव्हती. अप्पाना वाचवण्यासाठी त्याला हर प्रकारे प्रयत्नाची पराकाष्ठा करावी लागणार होती आणि म्हणूनच तो नामांकित क्रिमिनल वकील देसाईकडे आला होता आणि त्याने घडलेली सगळी हकीकत वकिलांना सांगितली.

" वकील साहेब, तर हे असं सगळं घडलं पण मी विश्वासाने सांगतो आमचे अप्पा असं कधीही करणार नाहीत. ते रागावले होते हे खरं आहे पण ते आपल्या मुलाच्या आनंदाचा शेवट असा कधीच करणार नाहीत "

" हां... अरविंद...

खुप साऱ्या गूढ गोष्टी असू शकतात, काही नको असणारी गुपिते बाहेर येऊ शकतात किंवा काही चोरांच्या मुर्खपणाचे दाखलेही भेटु शकतात किंवा कोणातरी हुशार व्यक्तीचे अप्पाना अडकवण्याचे प्रयत्नही....

मला सांगा अप्पाची कोणाशी काही वैर असण्याची शक्यता... "

" असू शकतं. खुप वेळेस गावकऱ्याचे भले करताना काही वाईट प्रवृत्तीना अप्पामुळे शिक्षा झाली आहे... " अरविंद.

"मला हे प्रकरण थोडं वेगळं आणि अवघड वाटत आहे म्हणजे यात फक्त कायद्याचं ज्ञान असून चालणार नाही. खुप साऱ्या ओळखी आणि तल्लख बुद्धिमतेचं काम दिसत आहे हे... " देसाई.

"वकीलसाहेब काहीही करा पण अप्पाना वाचवा.. वाचतील ना अप्पा???" अरविंद.

"हो पण यातून त्यांना आता फक्त देवच वाचवु शकतो" देसाई.

"म्हणजे???नेमकं काय म्हणायचं आहे तुम्हाला?" अरविंद

" माझा मित्र.. देव पटवर्धन हौशी वकील आहे. खुप कमी केसेस घेतो पण ज्या केसेस लढतो, त्या जिंकणे अशक्य असतात आणि तो मात्र ह्या केसेस जिंकणे अगदी शक्य करून दाखवतो. त्याची पद्धतच निराळी आहे. समोरच्या व्यक्तीच्या मनात काय चाललय याचा छडा तो अगदी काही सेकंदात लावतो..."

आज सकाळपासूनच तशी देवच्या मनाची चलबिचल चालु होती. वडिलोपार्जित संपत्तीचा एकुलता एक वारस होता देव. लहानपणीच त्याच्या वडिलांना पैश्याच्या हव्यासापायी खुनाच्या केसमधे अडकवण्यात आलं होतं.

तुरुंगात जाण्याआधीच बदनामीच्या भीतीने त्यांनी आपला जीव संपवला. मागोमाग धक्क्याने आईनेही प्राण सोडले. देव तेव्हा 14 वर्षांचा होता. तेव्हापासूनच देवने वकील होण्याचं नीश्चित केलं कारण वकिली हा एकमेव पेशा आहे, जिथे अन्याय झाला असेल तर त्याला योग्य न्याय मिळवून देता येतो फक्त अट एवढीच असते की निकाल सत्याच्या बाजूने लागावा हे वकिलाच्या मनात ठाम असलं पाहिजे. जिथे गुन्हेगार मुद्दाम कायद्याच्या पळवाटा शोधून निरपराध्याना अडकवतात. तिथे देव स्वतः त्यांची केस लढतो आणि त्यांना न्याय मिळवून देतो. याशिवाय कितीतरी नीराधारांना त्याच्या असंख्य ट्रस्ट मार्फत मदत मिळत राहते.

लहानपणापासूनच चौकस बुद्धि आणि आता एवढ्या अनुभवानंतर एवढ्या कमी वयातही त्याने बरच पुण्य आपल्या खात्यात जमा केलं होतं.

खरं तर तो एकटाच होता, आई वडील तर नाहीतच आणि लहानपणापासून त्याला ओझं समजणाऱ्या नातेवाइकांना तो गिणत नाही म्हणून त्याच्याजवळ कोणी नातेवाईकही नाहीत आणि अजून लग्न झालेलं नाही म्हणून बायका मुलांचा प्रश्नच नाही पण त्याच्या आयुष्यात एक मित्र, सखा , सोबती, सवंगडी होता. जो त्याला कुटुंबासारखाच होता. आशिष त्याचं नाव. जेवढया केसेस देव जिंकला होता त्या केसेस बद्दल माहिती आणून देणे, त्याला कामात मदत करणे या गोष्टी आशीष करायचा. तो नेहमी देव सोबतच असायचा कित्येक केसेसमधे अगदी शेवटच्या टप्प्यावर देव केस हरणार असं असताना आशीष त्याला भेटायला येतो आणि अशी काहीतरी माहिती आणतो की ती केस पूर्णतः देवच्या बाजूने पलटते. थोडक्यात काय तर तो देवचा कान आणि डोळा होता.

देवने त्यांच्या नावावर देवाशीष फाउंडेशन चालु केलं होतं. जे अडल्या नडल्याना मदत पुरवायचं, किती तरी हॉस्पिटल्स मधे त्यांची मदत पोहोचत. ब्लड बैंक, एम्बुलेंस अशी मेडिकल मदत असेल किंवा शिक्षण, रोजगार. सगळ्या प्रकारे ते गरजूंना मदत करत. बघणाऱ्याला दोघे भाऊ आहेत असच वाटे. एवढं प्रेम होतं दोघात.

आज सकाळपासूनची चलबिचलही त्यासाठीच होती. आशीषचा फोन आला होता. काहीतरी भन्नाट आणि अशक्य अशी केस आली होती आणि तो त्यासाठी खुपच उत्सुक होता. क्लाइंटला घेऊन तो थोड्याच वेळात येणार होता. काय केस असेल ??किती वेळ लागेल???

तो म्हणत आहे तेवढी कठीण असेल का?? कारण आजपर्यन्तच्या त्याच्या केस पाहता सगळ्या प्रकारच्या केसेस त्याने लढल्या होत्या आणि विशेष म्हणजे त्याला आजपर्यन्त हरवणारी केस अजून तरी त्याच्याकडे आली नव्हती आणि ही आजची केस त्या दर्ज्याची असेल का ??? याचा तो विचार करत होता. हीच तर देवची खासियत होती. तो प्रत्येक केसकडे नवीन संघर्षाच्या दृष्टीकोनाने पाहत असे आणि म्हणूनच तो तीतकाच गंभीरतेने काम करत असे. यशाचं वारं का काय, ते आजपर्यन्त त्याच्या जवळपासही कधी फिरकलेलं नव्हतं. विचारांच्या तंद्रितून त्याला गाडीच्या आवाजाने बाहेर आणलं. आशीष दरवाज्याबाहेर उभा होता. सोबत काही माणसं होती. त्यांना बाहेरच थांबायला सांगून एकटा आशीष आधी देवला भेटायला आणि केसबद्दलची पूर्व कल्पना द्यायला आत आला.

" काय रे आशु , माणसाची उत्सुकता अशी एवढा वेळ ताणुन धरल्याबद्दल मी तुझ्यावर केस का करू नये, मला एक कारण देशील???"

"एक काय देवा, हजार देतो. अरे इतके दिवस म्हणत होतास ना बुद्धिला खुराक होईल अशी एक पण केस नाही. तर घे तुला अगदी हवी तशी केस घेऊन आलोय. बुद्धिला खुराक तर आहेच पण तुझ्या शरीरालाही व्यायाम मिळेल अशी आहे"

"म्हणजे बाहेरगावची पार्टी दिसतेय बरोबर??"

" हो अगदी अचूक. आळेगावची केस आहे आणि ते पण तिथल्या पाटलांची.. अप्पासाहेब पाटील गावातील प्रतिष्टित, सन्माननिय बडी व्यक्ती... "

"त्यांचा खून झालाय???" देव.

"नाही त्यांच्या होणाऱ्या सुनेचा " आशीष.

"कोणी केला???" देव.

"त्यांनीच.. " आशीष.

"काय????" देव.

"होय तर प्रकरण असं आहे... " आशीष.

आणि थोड्यावेळात अगदी थोडक्यात आशीषने सगळी केस देवला समजावून सांगितली.

"काय मग??? आहे की नाही अवघड???" आशीष.

"अवघड अशी नाहिये फक्त खुप काम करावं लागेल इतकंचं आणि तू आहेसच की... काय???" देव.

"हो मग... आता तू त्यांच्या मुलाला तुझ्या कायद्याच्या भाषेत सांग काय सांगायचं ते, मी बोलावतो त्यांना " आशीष

"बाकी सगळं ठीक आहे आशु, तुला ही केस भेटली कुठे??" देव.

" तू आपला इथे सदाशिव पठेत आपल्या ऑफिसमधे बसून असतोस पण मला सगळीकडे लक्ष द्यावे लागते. तुझ्या नावाचा जप करत शोधत होते तुझं ऑफिस. किती वेळा सांगितल तुला, की काही तरी जाहिरात वगेरे लाव म्हणून.. ते आपले देसाई वकील आहेत ना, त्यांनी पाठवलं " आशीष.

" हो अरे, कुठेही आपली जाहिरात नाही पण तरी आपल्याकडे केस येतातच ना... आणि तू आहेसच की, माझ्या बुद्धिला खुराक भेटेल अश्या केसेस तुझ्यापर्यन्त पोहोचतातच. बोलाव आता त्यांना. " देव.

अरविंद आत आला आणि खुर्चीवर बसला. चहा पाणी वगैरे विचारून देवने बोलायला सुरुवात केली.

" तर अरविंद.. तुझ्या अप्पांची... म्हणजे तुझ्या म्हणलं तर चालेल ना ? चालेल असंच मी गृहीत धरतो. तर तुझ्या अप्पांची केस मला कळली आहे. पण त्याआधी मला तुला एक गोष्ट सांगायची आहे. नाइकांनी तुला माझ्याबद्दल काय सांगितलं ते मला माहिती नाही पण तुझे अप्पा जर खरंच निर्दोष असतील तरच मी ही केस घेणार. दोषी व्यक्ती माझ्या हातून वाचणारच नाही कधी. आणि निर्दोष व्यक्तीला मी कधी शिक्षा होऊ देत नाही.

तर मी आधी तुमच्याकडे येऊन स्वतः सगळ्या परिस्तिथीची शहानिशा करेन आणि मगच केस घेईन. कोर्टात न जाताही तुझे अप्पा सुटु शकतात फक्त पोलिसांना खरा गुन्हेगार शोधून द्यायचा. माझी काम करण्याची पद्धत थोडी वेगळी आहे. कळेल तुला हळू हळू. अप्पा निर्दोष असतील तर अप्पाच्या विरोधातले कितीही पुरावे असले तरी मी त्यांना वाचवणार पण जर अप्पा दोषी असतील तर मग मी ही केस घेणार नाही आणि अप्पाना कोणीही वाचवु शकणार नाही. "

"नाही, अशी वेळच येणार नाही.. मी तुम्हाला छातीठोक पणे सांगू शकतो की अप्पा निर्दोष आहेत. " अरविंद.

"झालं तर मग. सुटतील तुझे अप्पा. कारण कुठल्याच निर्दोष व्यक्तीला माझ्याकडे मदतीला आल्यावर शिक्षा होणार नाही याचं मी वचन दिलेलं आहे. "

आता खरी सुरुवात होणार होती देव आणि आशीषच्या कामाला. ह्या केसचा छडा लावण्यासाठी देवला आळेगावला जाव लागणार होतं. अप्पासाहेबांच्या वाड्यात राहावं लागणार होतं. तरच त्याला सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळणार होती. शिवाय घटनास्थळी जाऊन पाहणी केल्याखेरीज त्याला ह्या प्रकरणाचा छडा लावता आला नसता. आणि म्हणूनच तो त्या तयारीला लागला होता आणि तो त्याला हवं असलेलं सगळ सामान घेऊन निघाला.

त्याने त्याच्या बॅगमधे दोन - तीन विनोदी पुस्तके, आणि एक प्रवासवर्णन लिहण्यासाठी लागणारी डायरी घेतली होती. त्याच्यासाठी ह्या गोष्टी ताणतणावाच्या वेळेस जीवनदान ठरणार होत्या. ही झाली अत्यावश्यक गोष्टीची यादी. आता जीवनावश्यक गोष्टी, देव थोडा सगळ्यापेक्षा वेगळाच होता. पेशाने जरी तो वकील असला तरी कोर्टाबाहेर मात्र तो अगदी फ़िल्मी असल्यासारखा वागायचा. कुठल्याही नवीन जागी गेल्यावर माणूस आधी ती जागा आपल्या सोईची आहे की नाही हे पाहतो. देव मात्र कुठल्या चित्रपटामधे ही जागा कोणत्या सीनमधे पाहिली आहे का याचा विचार करतो. तसेच विचार त्याचे कपड्याच्या बाबतीत सुद्धा होते. तो कधी अगदीच रंगीबेरंगी तर कधी फुलाचे शर्ट, कधी जुन्या काळातील अमिताभ स्टाइलचे कपडे तर कधी एकदम नविन डिज़ाइनर लुक असा पेहेराव करत. असा अवखळ आणि मस्तीखोर होता देव. सगळं सामान घेऊन देव आळेगावात पोहोचला पण देवची एक सवय होती. चांगली होती की वाईट ते ठाऊक नाही पण नक्कीच त्याच्या कामकाजाच्या पद्धतीबद्दल माहिती असणाऱ्या लोकांसाठी ही सवय कोडयात टाकणारी होती. कुठल्याही केसच्या कामाला सुरुवात करण्याआधीचा दिवस तो पूर्ण मजेत घालवायचा कारण पुढे किती दिवस आणि किती रात्री कामासाठी द्याव्या लागतील हे त्याला माहिती नसे. म्हणून तो एक दिवस मजेत राहायचा आणि त्याचा तो मजेचा दिवस आज होता. त्याने आळेगाव येईपर्यन्त सुद्धा

प्रवासात बरीच मौज केलेली होती. रिक्शा, बस, बैलगाडी, सायकल सगळं काही वाटेत चालवत हसत-खेळत भरपूर गोष्टींची चव चाखत तो इथवर आला होता. तरीही तो आता वाडयावर न जाता आधी गाव फिरून घेणार होता.

दिवसभर गावात सैर सपाटा मारून झाल्यानंतर त्याने वाड्याकडे त्याची वाट वळवली. वाड्यात पाऊल टाकल्यानंतर आधी त्याने सभोवार नजर फिरवली आणि संपूर्ण वाड्याचा अंदाज बांधला. एखाद्या मराठी मालिकेला शोभेल असाच तो वाडा होता. त्यानंतर त्याने हळू हळू घरातील लोक आणि नोकरांचं निरीक्षण केलं. एव्हाना सगळयांच्या ओळखी झाल्या होत्या. एवढ्या केसेस सोडवल्यानंतर देवचा अनुभव असा होता की घरातील ज्या बारीक सारिक गोष्टी नोकरांना माहिती असतात त्या घरातील व्यक्तींनाही माहिती नसतात. म्हणून त्याने आल्यापासूनच नोकरांसोबत सलोखा ठेवला. इकडच्या तिकडच्या गोष्टींमधे अडकावून समोरच्या व्यक्तीच्या नकळत त्याच्याकडून माहिती काढून घेण्यात त्याचा हातखंडा होता. अरविंदने खुपच आदरभाव दाखवून त्याचं स्वागत केलं होतं. त्याची बडदास्तही तशीच ठेवली होती, देवला काय हवं नको पाहायला एक नोकर ठेवला होता. पण देवने त्याला नकार दिला. मी आपलं घर समजून हवं ते, हवं तेव्हा मागेन असं सांगून त्याने अरविंदची समजूत घातली. बऱ्याच वेळेस अशी नोकर मंडळी आपल्यावर नजर ठेऊन असतात आणि इकडच्या बातम्या तिकडं करतात म्हणून सतत कोणी आपली विचारपुस करणार टाळलेलंच बरं असं देवच मत होतं.

त्यानंतरचे 2 - 3 दिवस देवने निरीक्षण केलं घरातील व्यक्ती, त्यांचं वागणं, बोलणं त्यांचे स्वभाव, चांगल्या वाईट प्रसंगीची त्यांची प्रतिक्रिया या सगळ्या गोष्टींचा विचार केला. घरातील प्रत्येक व्यक्तींसोबत थोडाफार वेळ घालवला आणि या चार दिवसांनंतर त्याचं प्रत्येकाबद्दल एक मत बनत होतं.

अरविंद खुपच भावनिक होता. आई वडिलाबद्दलचं त्याचं प्रेम. त्याची हुशारी, त्याची काळजी, लहानपणापासून त्याचं वाढत जाणार यश, तरीसुद्धा त्याच्या स्वभावात असणारा नम्रपणा. या सगळ्या गोष्टी देवला आवडल्या होत्या. संध्याला तो का आवडला आणि

त्याच्यासाठी ती एवढ्या लांब का आली यात प्रश्न पडण्यासारखं नक्कीच नव्हतं. थोडक्यात त्याच्याकडे पाहून तो निर्दोष असल्याचे पुरावे पाहण्याची गरज नव्हती.

अवंतिका जरा समजण्यास कठीणच होती शांत पण विचारी, हुशार पण नाराज असं काहीसं घातक रसायन होतं ते. तसं पाहिलं तर तिच्याकडे कारणही होतंच, तिचं लग्न होणार होतं अरविंदसोबत. अरविंदसारखा मुलगा हातातून निसटण्याचा ताण कोणीही समजू शकेल.

रख्माअक्का सारखी प्रेमळ, संयमी मूर्ती क्वचितच दिसते. नोकर मंडळी तर कायम त्यांच्या मायेच्या सावलीतच असत. सगळ्या गावाचा विचार पोटच्या मुलासारखा करणारी व्यक्ती कोणाचं वाईट चिंतू शकते यावर देवचा तरी विश्वास नव्हता.

रख्माअक्का बरोबर 30-35 वर्षे संसार करणारे, गावाचा विकास करणारे अप्पा शिस्तीचे, रागिट असू शकतात पण निर्दयी असतील यावर विश्वास बसणे थोडे कठिणच होते.

आणि आता उरला सुरला तो सर्वेश, बिचारा सुट्टीला म्हणून आला आणि नको त्या संकटात भागीदार झाला.

या सगळ्यातुन या कुटुंबाला बाहेर काढावंच लागेल.

देवला येऊन आता 5 दिवस होत होती. संध्याकाळी जेवणे उरकल्यावर सगळे व्हरांड्यात बसली होती. त्यावेळी बारकाइने सगळ्यांचं निरीक्षण करून देवने बोलायला सुरुवात केली.

" अरविंद, मला गावात येऊन आता 5 दिवस पूर्ण होत आहेत. मी माझं परीक्षण जेमतेम संपवलंच आहे. आता एक शेवटचा टप्पा उरला आहे तो म्हणजे माझ्या आशिलाची म्हणजेच अप्पासाहेबांची भेट. मी त्यांना काही प्रश्न विचारणार पण हे फक्त औपचारिकता म्हणून. मला आता खात्री पटली आहे की अप्पा निर्दोष आहेत. त्यांना भेटल्यानंतर मी तुम्हाला सविस्तर सगळं सांगेन.

त्यामुळे आता तुम्ही निश्चिन्त रहा. तुमच्यासाठी खरी कसोटी होती ती अप्पा निर्दोष आहेत हे मला पटवून देणं. आता कोर्टात त्यांना निर्दोष पटवून देणं ही सर्वस्वी माझी जबाबदारी असेल. पण कोर्टात जाण्याची वेळ येणार नाही असं दिसतंय. " देव.

" खरंच!, हे पहा देव तुम्हाला कितीही पैसे लागले. काहीही मदत लागली तरी ती आम्ही करायला तयार आहोत फक्त आमच्या अप्पाना यातून सुखरूप वाचवा. " अरविंद.

हे सगळं चालू असताना अवंतिका मात्र वेगळ्याच विचारात होती,

" संध्याचा खून झाला त्या रात्री अप्पानि स्वतः माझी माफी मागून अरविंद आणि संध्याच्या लग्नाला त्यांची संमती असल्याचं सांगितलं होतं. पण मग तरी संध्याचा खून अप्पा का करतील?? आणि आता हा देव म्हणतोय अप्पा निर्दोष आहेत, मग संध्याचा खून नक्की कोणी केला ?? मान्य आहे आजवर अप्पाचे हितचिंतक जेवढे आहेत तेवढेच त्यांचे शत्रुही आहेत. पण कोणाचा जीव इतक्या सहज घेण्यास ते धजावतील असं मला तरी नाही वाटत. संध्याने त्या दिवशी बोलता बोलता मला सांगितलं होतं की तिला कराटे येतात. तिचं प्रशिक्षणही त्यात झालेलं आहे. मग असं असताना दरोडेखोरांनी तिला असं मारलं हे तरी कसं मानायचं, या सगळ्या गोष्टी मी देवला सांगाव्यात का??? याचा अप्पांच्या सुटकेत काही उपयोग होईल???? माझ्या आनंदासाठी अप्पांची या लग्नाला नाराजी होती. अरविंदला माझ्याबद्दल तिरस्कार तर वाटत नसेल ना?? "

इकडे पोलिस स्टेशनमधे इंस्पेक्टर जाधवांना बातमी मिळाली. अड्वोकेट देव पटवर्धन ही केस लढवणार आहेत आणि थोड्या वेळात ते अप्पासाहेबांना भेटायला येतील. आता तर इंस्पेक्टर जाधवची खात्रीच पटली की अप्पा निर्दोष आहेत. इंस्पेक्टर जाधव आजपर्यन्त कधी देवला भेटले नव्हते पण त्यांच्या अन्य इंस्पेक्टर मित्रमंडळीकडून देवची कीर्ति त्यांच्यापर्यन्त पोहोचली होती. देव पोलिसांनाही केससंदर्भात काही सल्ले देतो हे ते ऐकून होते म्हणून आता ते आतुरतेने देवची वाट पाहत होते.

थोड्या वेळात देव पोलीस स्टेशनमधे हजर झाला.

तो प्रसन्न चेहरा, बोलके पण तेवढेच गूढ़ डोळे, मनाला भारावून टाकणारे व्यक्तीमत्त्व पाहून इंस्पेक्टर जाधव कुठे तरी विचारात हरवून गेले. देवच्या बोलण्याने मग ते भानावर आले.

" ओ हैलो, इंस्पेक्टर जाधव ?? कुठे हरवलात???"

" ओह ! खरंच माफ करा वकीलसाहेब जरा विचारात अडकून गेलो.... "

" देव... मला देव म्हणालात तरी चालेल.. कसं आहे ना जाधवसाहेब, उगाच वकीलसाहेब म्हणलं की सतत काळा कोट आणि नियमावली दिसते. त्यापेक्षा हे बरं... हा हा हा "

" तुमचं वर्णन जसं ऐकलं होतं अगदी तसेच आहात तुम्ही... तुम्ही भेटु शकता तुमच्या आशिलाला आणि हो माझी काही मदत लागली तर सांगा. "

" अरे लागली तर म्हणजे काय लागणारच!!, धन्यवाद. " देव.

अप्पासोबतच बोलण झाल्यानंतर आणखी एक अशक्य केस सोडवल्याचा आनंद देवच्या चेहऱ्यावरती होता. अप्पा आता देवच्या नजरेत निर्दोष होते. पण योग्य पुराव्यानिशी त्यांना इंस्पेक्टर जाधव समोर निर्दोष सिद्ध करणे आता गरजेचे होते. आणि त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे होते, खऱ्या गुन्हेगाराला दोषी सिद्ध करून इंस्पेक्टर जाधवांच्या स्वाधीन करणे. आणि तो म्हणजे सर्वेश !!! त्या पोरावर मला सुरुवातीपासूनच शंका होती. त्याच्या डोळ्यात अपराधीपणाचा भाव होता. माझ्या नजरेला नजर मिळवत नव्हता तो. आता खरं काम होतं आशीषचं !! सर्वेशला गुन्हेगार सिद्ध करण्यासाठी योग्य पुरावे शोधणं. देवने आशीषला फ़ोन केला.

" आशु, केस सोडवली आहे मी, आता तुझी कसोटी. "

" अप्पा निर्दोष आहेत हे शोधलं की खरा खुनी शोधला???''

'' दोन्ही! आता फक्त मी सांगतो ते कर. आणि हो तुझी पुढची केस तयार ठेव. ही केस आता फार दिवस नाही राहणार. "

" अरे हो हो... एवढी घाई! चल तुझं काम सध्या संपलय मला माझं करू देत. "

देवला खात्री होती आशीष त्याचं काम एका दिवसात पूर्ण करेल आणि आज शनिवार होता त्यामुळे केसचा अंतिम दिवस त्याने सोमवार ठरवला. सोमवारी खऱ्या गुन्हेगाराला पकडण्यासाठी तयार रहा आणि माझ्या आशिलाला सोडण्याचीही तयारी करा, असं इंस्पेक्टर जाधवला सांगून देव वाड्याकडे निघाला. आज तो अगदी शांत, चिंताविरहित झोपणार होता.

वीस बाविस लोक असलेलं घर म्हणजे अगदी खळखळ करणाऱ्या नदीपात्रा प्रमाणे असतं. कधी कधी खुप आनंद देऊन जातं पण भावनांच्या प्रवाहाला बांध घालता आला नाही तर मात्र ही नदी जवळपासचा प्रदेश उध्वस्त करून टाकते. कसल्याशा गोंधळाने देवला जाग आली.

रविवारची सकाळ म्हणजे कशी निवांत असायला हवी पण हा एवढा गोंधळ कसला ते या पलंगावरून उठुन खाली गेल्याशिवाय कळणार नव्हते. उठा देव साहेब आणि लागा कामाला असं म्हणून देव उठला.

खाली जाऊन पाहतो तर काय रख्माअक्का, अरविंद बाकी सगळी मंडळी चिंतेत दिसत होती. अरविंदचे फोन वर कोणाशी तरी महत्त्वाचे बोलने चालू होते. त्यांच्या चेहेऱ्यावरून तरी जीवन मरणाचा प्रसंग भासत होता. अरविंदचा फ़ोन झाल्यावर देवने विचारपुस केली. अवंतिकासाठी सगळे चिंतातुर होते.

रख्माअक्का काळजीपोटी डोळ्यात पाणी साठवून बोलायला लागल्या, ''शनिवारी सकाळी अवंती तिच्या जुन्या कॉलेजमधे काही कागदपत्रा संदर्भात तातडिने बोलावलं आहे असं सांगून कोल्हापुरला गेली होती. सकाळी सर्वेश झोपला होता म्हणून एकटीच निघाली. वाटेत मैत्रिणीला भेटून तिला घेऊन जाते म्हणाली. सर्वेश उठल्यावर तोही दुपारी तिच्या मागोमाग गेला. रविवारची सकाळ उजाडली तरी दोघांचाही फोन आला नाही. आणि आम्ही

लावला तर लागतही नाही. अरविंदने कॉलेजमधे विचारपुस केली तेव्हा कळलं असा कोणताही फोन कॉलेजमधून केलेला नाही मला तर पोरीची खुप काळजी वाटत आहे. "

देव हे सगळं ऐकत असताना त्याच्या मनात विचार चालूच होते " बापरे, मी काल पोलिस स्टेशनला गेल्यावर इकडे बरचं काही घडून गेलेलं दिसत आहे. शक्यता तर खुप काही गोष्टींची वाटत आहे. सर्वेशला चाहूल तर लागली नसेल की त्याची खुनी म्हणून मला ओळख पटली आहे???? आशु कोल्हापुरात पोहोचला असेल त्यामुळे काळजीच काही कारण नाही पण एका अर्थी चांगलंच झालं आशुला या सगळ्या गोष्टींनी त्याच्या कामात मदतच होईल. "

इकडे आशु देवने सांगितल्याप्रकारे कोल्हापुरात शनिवारीच दाखल झाला होता. त्याने आपल्या कामाला झटुन सुरुवात केली होती. कॉलेज, होस्टेल्स, सर्वेशचे मित्र, सगळ्या गोष्टींची तपासणी केली. त्याला वाटलं होतं त्यापेक्षा खुपच सहज त्याला सर्वेशबद्दल ची सगळी माहिती द्यायला लोक तयार होत होते. इथे आल्यावर आशिषला सर्वेश खुप नावाजलेली व्यक्ती असल्याची कल्पना आली होती. तो कॉलेजमधे शिकत असूनही गावातली हर चौथी व्यक्ती त्याला ओळखत होती. साहजिकच त्याने एवढी मजल तीन - चार वर्षात मारलेली नाही. त्याच्या शाळेत जाऊन आशिषला काही अंशी समाधानकारक उत्तरे मिळाली. त्याच्या मानसिक स्तिथिबद्दलही हॉस्पिटलमधून त्याला बरेच धागेदोरे मिळाले. त्याने याआधी आत्महत्येचेही प्रयत्न केलेले होते अशा व्यक्तीने कोणाचा जीव घेणे अगदीच शक्य होते आणि एवढे पुरावे आशिषला पुरेसे होते. बाकी गुन्हेगाराकडून त्याचा गुन्हा सर्वांसमोर वदवून घेण्यासाठी देव आहेच.

सगळे पुरावे घेऊन परत जाताना त्याला सर्वेश दिसला. बहुदा तो दुपारच्या गाडीने आला असावा. उतरल्यावर त्याला कोणाचा तरी फोन आला आणि तो फोनवर गयावया करतोय असं भासत होतं. एवढ्या अनुभवानंतर लिप रीडिंग आशिषला येत होती. यावरून काय घडले असेल याचा अंदाज त्याला आला आणि त्याने सर्वेशचा पाठलाग केला.

सर्वेशला जो कोणी फोन वरून धमकी देत होता तो निश्चित त्याच्या एवढा नव्हता. कारण सर्वेश त्याच्यासोबत अदबीने बोलत होता. प्रकरण दिसतं आहे तेवढं सोपं नाही. त्याने तत्काल पोलिसांना मदतीसाठी फोन केला.

सर्वेशला आता आपल्याच वागण्याचा राग येत होता. आपल्या एकलकोंडया आणि उद्धट स्वभावामुळे त्याला मित्र तर नव्हतेच पण त्याने क्षणा क्षणाला शत्रु बनवले होते. आणि त्याची शिक्षा आता अवंतीला मिळत होती.

" पाच सहा वर्षापूर्वी केलेल्या चुकीची शिक्षा आता अशी अवेळी माझ्या समोर येईल असं मला वाटलं देखील नव्हतं. हो !!!!!! मी भरकटलो होतो, दुःखाच्या क्षणी स्वतःला सावरून खंबीरपणे त्याला तोंड देणं जमलं नाही मला. आधी आई गेली आणि नंतर बाबाही. मला मान्य आहे, आप्पानी मला कधीच काही कमी पडू दिलं नाही पण त्यांचं हे सगळं देणं सुद्धा मला कधी न फेडता येणाऱ्या कर्जासारखं वाटत होतं आणि म्हणून पैसा कमवण्यासाठी मी त्या राजेशवर विश्वास टाकून त्याच्या सोबत कामाला जात होतो. सुरुवातीला मला वाटत होतं, हे लोक जबरदस्ती करून, मारामारी करून लोकांना न्याय मिळवून देतात. कायदा मोडून का असेना पण लोकांच भलं करतात. भलेही ते स्वतःला समाजसेवक म्हणवत असतील, स्वतःच्या नावाचे बैनर गावात लावत असतील पण दिवसअखेर कोणाला तरी न्याय मिळतो. मला वाटलं माझ्या सोबत नियतीने अन्याय केला म्हणून काय झालं, मी कोणाला तरी न्याय मिळवून देईन पण हळू हळू मला कळत होतं, कुंपनच शेत खात होतं. हेच ते लोक होते जे गोड बोलून शेतकरी, कष्टकरी सामान्य जनतेला भुरळ पाडून त्यांचच नुकसान करत होते. मी पोलिस स्टेशनला जाऊन तक्रार केली. माझा जबाब नोंदवला आणि त्यांना अटक झाली. आज तीच लोकं शिक्षा भोगुन आल्यावर आधी मला शिक्षा द्यायला आली.

हो मीच चुकलो, या सगळ्या पैश्यांच्या आणि चुकीच्या माणसांच्या आधीन गेलो नसतो तर आज हा प्रसंग ओढावला नसता.

पण काय करू माझ्या भावनांना काबूत ठेवण माझ्या हाताबाहेर जातं जसं त्या रात्री झालं.

अवंती किती आनंदी होती, जेव्हा अरविंद येणार होता. तिच्या चेहेऱ्यावरचा तो आनंद मी फक्त बाबा असताना पाहिला होता. किती स्वप्न रंगवली होती तिने, किती इच्छा प्रकट झाल्या होत्या तिच्या मनात, सगळ्यावर त्या अरविंदनी पाणी फेरलं आणि त्याला कारण होती ती संध्या.

अप्पानी त्यांच्या मुलासमोर हार मानली आणि अवंतीने त्यांच्या आनंदासाठी तिचं मन मारलं. संध्याला पाहून मला राग अनावर झाला आणि नको ते माझ्या हातून घडून गेलं.

जे झालं ते कोणाला सांगण्याची हिम्मत माझ्यात नव्हती आणि बिचारे अप्पा ह्यात अडकून गेले. यातून बाहेर कसं पडता येईल याचा विचार चालुच आहे आणि आता हे नविन संकट समोर, आयुष्य हे असचं असतं का ???? संकटांची रांग लावलेली असते आपल्यासाठी आणि आपण मात्र फक्त हजेरी लावून त्या रांगेतुन चालत जायचं असतं.... "

विचार करत करत सर्वेश सांगितलेल्या ठिकाणी आला. एका जुनाट गोदामाचा पत्ता होता तो. सगळीकडे फक्त पोत्यांचा ढिग दिसत होता. कित्येक वर्षे इथे कोणी फिरकलेही नव्हते आणि आता माझ्या मदतीलाही कोणी येईल अशी आशा करणे चुकीचेच आहे. त्यांचे हात पाय पडून अवंतीला घेऊन घरी जाऊया आणि त्या वकिलाला सगळं सांगून टाकुया. पुढंचं पुढे पाहता येईल असा विचार त्याच्या डोक्यात चालू असतानाच समोर चार व्यक्ती त्याला दिसल्या राजेश आणि त्याचे साथीदार. अवंतीला एका खुर्चीला बांधून ठेवले होते. तिच्या तोंडावर पट्टी बांधली होती.

" राजेश, जे झालं ते झालं, आता त्या गोष्टीचा प्रतिशोध माझ्या बहिणीकडून घेऊन तुला काय मिळणार आहे ???? मला माफ़ कर, तू म्हणशील तसं कारायला मी तयार आहे पण माझ्या बहिणीला जाऊ दे. तिचा काहीही दोष नाही. " सर्वेश.

" वा रे वा, तुझी बहिण आहे ती, हाच तिचा दोष म्हणावा लागेल, आमच्याकडून पैसा कमावलास आणि नंतर आम्हालाच दगा दिलास ??? तुझ्यामुळे मी जेलची हवा खाऊन आलोय आणि आता तुला शिक्षा झालीच पाहिजे. " राजेश.

"मला तर नियतीने द्यायची ती शिक्षा दिलीच आहे , तू काय वेगळी देणार? तरी मी तुझं सगळं ऐकायला तयार आहे तू फक्त अवंतीला घरी जाऊ दे. " सर्वेश.

" मी जेल मधे होतो म्हणून हॉस्पिटल मधे असलेली माझी बहिण वाचु शकली नाही , तिच्या ऑपरेशनसाठी लागणारे पैसे तिच्या पर्यंत पोहोचायच्या आतच तिचा अंत झाला आणि

तू म्हणतोय तुझ्या बहिणीला जाऊ देऊ??? माझी बहिण पण निर्दोष होती. अजून तिने जग पाहिलं नव्हतं पण तुझ्यामुळे माझ्या चुकीची शिक्षा तिला मिळाली आणि आता तुझ्या चुकीची शिक्षा तुझ्या बहिणीला मिळणार. तुझ्या डोळ्यासमोर मी तिला मारणार मग त्यानंतर मला परत जेल झाली तरी बेहत्तर "

राजेशने अवंतीजवळ उभ्या असणाऱ्या त्याच्या साथीदाराला अवंतीवर बंदूक धरायला सांगितले. तो अवंतीच्या डोक्यावर बंदूक ठेवणार एवढ्यातच पोलिसांनी त्याच्या हातावर गोळी चालवली आणि सगळ्या बाजूने त्यांना घेरलं. आशुचं नेहमीप्रमाणे टाइमिंग अगदी बरोबर होतं. सगळ्या गुन्हेगारांना अटक झाली होती. आता रात्र झाली होती म्हणून आशु अवंतिका आणि सर्वेशला घेऊन उद्या म्हणजे रविवारी आळेगावला जाण्यासाठी निघणार होता.

रविवारी सकाळी देवचा फोन आल्यावर आशुला जाग आली. त्याने सगळी हकीकत देवला फोन वरून कळवली. देवने घरच्यांना अवंती सुखरूप असल्याची बातमी दिली आणि आता सर्वेशचं सत्य घरच्यांना कसं सांगायचं ह्याचा विचार त्याच्या डोक्यात चालू झाला.

आशु अवंती आणि सर्वेशला घेऊन संध्याकाळी घरी आला. रख्माअक्का अवंतीला कुशीत घेऊन रडत होत्या. काय झालं होतं हे जाणून घेण्याची सगळ्यांचीच उत्सुकता होती पण सगळे खुप थकले आहेत सकाळी बोलुया, असं सांगून देवने सगळ्यांना झोपायला पाठवलं. आता तिथे फक्त आशु आणि देव होते त्यांना बऱ्याच गोष्टींवर चर्चा करायची होती.

सकाळ कधी होते याची वाट पाहत जणु रात्रभर कोणी झोपलेच नव्हते. आता आपण इथे घरी सुखरूप आहोत पण पोलिसांना थोडा उशीर झाला असता तर आपला जीव गेला असता या विचाराने अवंतीच्या अंगावर शहारे येत होते.

आपल्या चुकीमुळे अप्पा विनाकारण अडकले आणि आपली चूक कबूल करण्याची हिम्मत आपल्यात नाही म्हणून ते शिक्षा भोगत आहेत याचा पश्चाताप सर्वेशला झोपु देत नव्हता.

देवला येऊन आता आठवडा होईल तरी केस सूटत नाहिये आणि तो काही सांगतही नाहिये. अप्पांना कोणत्या प्रकारे लवकर सोडवावे ही चिंता अरविंदला भेडसावत होती.

सोमवारची सकाळ उजाडली. सकाळ होताच सगळे उठून तयारी करून बसले. आज कोणत्याही परिस्थितीत देवकडे आपला गुन्हा कबूल करायचा, असं सर्वेशने ठरवलं होतं. देवने सगळ्यांना व्हरांड्यात बोलावलं.

" आज मी तुम्हाला दिलेलं वचन पूर्ण करणार आहे आणि अप्पांना यातून निर्दोष सोडवून खऱ्या गुन्हेगाराला पकडणार आहे. " देव.

देवचं बोलण चालू होत तेवढ्यात इंस्पेक्टर जाधव अप्पाना घेऊन आले.

" होय. देव म्हणतात ते अगदी बरोबर आहे. त्यांनी मला या सगळ्याची कल्पना दिली आणि अप्पाना निर्दोष सिद्ध केलं मी तुमचा आभारी आहे देव!'' इंस्पेक्टर जाधव.

" अहो आभार प्रदर्शन नंतर करा आधी गुन्हेगाराला ताब्यात घ्या" देव.

" काय??? गुन्हेगार इथेच आहे??? हे कसं शक्य आहे??" अरविंद.

" हो हो थांबा, सगळे शांत व्हा. गुन्हेगार स्वतःच कबूल करेल... काय सर्वेश???" देव.

" हो. मीच गुन्हेगार आहे. चुकलं माझं अवंतीच्या सुखाआड येणाऱ्या संध्याचा राग मी आवरु शकलो नाही. मला क्षमा करा, अप्पा मी तुमचा विश्वासघात केला. " सर्वेश

आशुने कोल्हापुरात घडलेली सगळी हकीकत आणि मिळालेले सर्व पुरावे व्यवस्थितरित्या सगळ्यांना सांगून इंस्पेक्टर जाधवांच्या हवाली केले. पण त्याच्या मनात काही शंका होत्या म्हणून त्याने देवला विचारलं.

" देव , तुझ्या सांगण्यावरून मी कोल्हापुरला गेलो आणि सर्वेश विरूद्धचे पुरावे जमा केले पण सर्वेश गुन्हेगार आहे हे तुला कसं कळलं???"

"फार काही अवघड नव्हतं आशु, मी गावात आल्यावर पहिल्याच दिवशी माझ्या लिस्टमधे सर्वेशचं नाव सगळ्यात वर लिहिलं होतं. पहिल्या दिवशी गावात फेरफटका मारताना मला गावकऱ्यांकडून सगळ्या वाड्यातल्या मंडळी बद्दल समजलं. बाकी सगळे चांगले होते पण गावकऱ्यांचं सर्वेश बद्दलच मत काही चांगलं नव्हतं. त्यात अप्पा अरविंदवर रागवून कुठे गेले होते, हे कोणाला माहिती नव्हतं पण गावातल्या लोकांनी त्यांना कोल्हापुरच्या बसमधे चढ़ताना पाहिलं होतं. म्हणजे ते सर्वेश सोबत होते.

संध्यावर राग असणारी दोनच व्यक्ती आपल्या डोक्यात होती अप्पा आणि अवंती. पण सर्वेश सुद्धा हे करू शकतो हे गावातल्या व्यक्तींच्या बोलण्यावरून समजलं. बाकी त्याचं निरीक्षण मी केलं तेव्हा मानसिक रोगींची सगळी लक्षण त्याच्यामधे दिसत होती.

मग प्रश्न उरतो तो पुराव्याचा. अप्पा विरूद्धचा पुरावा होता की त्यांचं लॉकेट संध्याच्या मृतदेहाजवळ सापडलं आणि म्हणून मी माझ्या शेवटच्या शंकेच निरसन करण्यासाठी अप्पाला भेटायला गेलो आणि त्यांच्या कडून मला जी गोष्ट हवी होती ती मिळाली. त्यांनी ते लॉकेट कोल्हापुरातुन येताना सर्वेशला भेट दिले होते आणि त्यांनी ते स्वतः त्याच्या गळ्यात घातले होते आणि त्याच रात्री सर्वेशने संध्याचा खून केला म्हणून त्यावर फक्त अप्पांच्या हाताचे ठसे सापडले.

अप्पानी लॉकेट सर्वेशला दिले तेव्हा तिथे सर्वेशचा रूममेटसुद्धा होता त्यामुळे आधी मी त्याला ही गोष्ट विचारली होती. नाहीतर अप्पानी सर्वेशला वाचवण्यासाठी ही कबूली कधी दिलीच नसती की त्यांनी ते लॉकेट सर्वेशला दिले होते.

अप्पा तुमचं मन खुप मोठं आहे. मी तुम्हाला वचन देतो सर्वेशची केस मी स्वतः लढेन आणि त्याला कमीतकमी शिक्षा होईल अशी व्यवस्था करेन. "

" पण देव, त्या दरोड्याचं काय ? गूंगीचं औषध कोणी दिले होते???" इंस्पेक्टर अजूनही गोंधळात होते.

" हो, दरोडा झाला होता. त्यांनीच गूंगीचं औषध फवारलं होतं पण त्यावेळी सर्वेश आणि संध्या दोघे घरात नव्हते म्हणून ते शुद्धिवर होते. त्या दरोडेखोरांचाही मी मागोवा घेतला आणि काळजी करू नका. त्यांना पुणे पोलिसांनी पकडले आहे. चोरीच्या हेतुने त्यांनी प्रवेश केला आणि कुत्री मागे लागल्यामुळे चोरीचा माल तिथेच टाकून पळून जावे लागले असे त्यांनी कबूल केले आहे. बाकी कहानी सर्वेशने सांगितली तर स्पष्ट होईल. "

" हो, त्या रात्री सगळे झोपले पण मला राहून राहून अवंतीचा विचार येत होता.. तिचं प्रेम तिला मिळाल नाही तर ती कशी सुखी होणार? या चिंतेत मी तसाच घराबाहेर पडलो. तास दोन तास चालून आल्यावर मी वाड्यामधे कसली तरी हालचाल पाहिली. मी वाड्याचा दरवाजा उघडला तो पर्यन्त दरोडेखोर पळून गेले. मी सगळ्यांना हाक मारली पण कोणी काही उत्तर दिलं नाही. आतमधे आल्यावर मला कळले की त्यांनी प्रत्येक रूम समोर गूंगीचे औषध फवारले आहे म्हणून कोणाला उठवण्यात काही तथ्य नाही. व्हरंडयात संध्या बेशुद्ध होऊन पडली होती. तिला दरोडेखोरांनी पाठीमागून धक्का दिला होता असं वाटत होतं. तिच्या हातात पाण्याचा ग्लास होता त्यावरून ती पाणी पिण्यासाठी उठली असेल असा अंदाज बांधला. तिच्या डोक्याला जखम होती. मी खरं तर तिची मदत करायला हवी होती पण माझ्या डोक्यातले विचार तिला पाहून आणखी वाढले आणि पुढे तुम्हाला माहिती काय झालं. "

" झालं तुमच्या शंकांच निरसन इंस्पेक्टर??. " देव.

" हो नक्कीच, तुमचे खुप खुप आभार देव. एवढी किचकट केस तुम्ही खुपच सरळ आणि योग्य पद्धतिने सोडवलीत. " इंस्पेक्टर जाधव.

आणि पुन्हा एकदा देवने अशी अशक्य केस शक्य करून दाखवली. सगळ्यांचा निरोप घेऊन देव आणि आशु पुण्याला निघाले.

" चला, आता पुढची केस मिळे पर्यंत तरी आराम करता येईल. आशु कुठे तरी जाऊया सुट्टीला. काय म्हणतोस??"

" एवढ्या लवकर काही यातून सुटका नाही देव! पुढची केस तुझी वाट पाहत आहे. "

" तुला केस मिळाली??? मग सांग आता कुठे आहे आपला पुढचा मुक्काम???"

" पणजी....... "

सुधीर आज खुप कंटाळवाणा दिसत होता. भारतीय वंशाचा अमेरिकेतील एक उत्तम लेखक होता तो. त्याच्या आतापर्यन्तच्या रहस्यकथांमुळे त्याने खुपच नाव कमावले होते. त्याच्या कथा खुपच वेगळ्या धाटणीच्या होत्या आणि म्हणून सगळे खुप आतुरतेने त्याच्या कथांची वाट पाहत असायचे. पण आज सहा महीने झाले. त्याला काही केल्या नवीन कथा मिळत नव्हती. या वेळेस तो काही तरी खास अश्या गोष्टीच्या शोधात होता. खुप विचार केल्यावर त्याला एक कल्पना सुचली. त्याला एका सुट्टीची गरज होती. आणि ती सुद्धा नवीन ठिकाणी. म्हणून त्याने चर्चेसाठी राहुलला बोलवले. राहुल त्याचा असिस्टेंट होता.

" राहुल, खुप दिवसांपासून तू पाहतोच आहेस. मला काही लिहिण्यासाठी नवीन कथा सुचत नाहिये. मी ठरवले आहे, आता सुट्टीला जायचं. कुठे तरी नवीन आणि चांगल्या ठिकाणी. जे मला लिहिण्यासाठी प्रेरणा आणि कथा दोन्ही देईल. तू सुचव ना,

लंदन, पॅरिस, अम्स्टरडैम कुठे जाऊ???"

" सुधीर सर, मला वाटत तुम्ही भारतात जावं, तिथे तुम्हाला नक्कीच काही तरी भेटेल. माझ्या चुलत भावाचं लग्न आहे पुढच्या महिन्यात मुंबईला. मी जाणारच होतो, आपण दोघेही जाऊया आता. तुमची सुट्टीही होईल आणि काम पण. आणि मला पण कुटुंबाला वेळ देता येईल. "

" ठीक आहे, माझा पण एक मित्र सध्या गोव्याला असतो. त्याचाही खुप दिवसांचा आग्रह होता. या निमित्ताने त्यालाही भेटता येईल. फार वेळ नको वाया घालवु, लगेच टिकेट्स काढून टाक. "

सुधीर आणि राहुल दोघेही दुसऱ्यादिवशी सामान घेऊन निघाले. मुंबई विमानतळावरून बाहेर पडल्यावर दमट वातावरणामुळे हवेत असणारा उकाडा जाणवत होता. सर्वांगावर घामाच्या धारा वाहत होत्या. थोडा वेळ मुंबईमधे फिरून रात्रीच्या ट्रेनने ते गोव्याला निघणार होते. पण ट्रेन रद्द झाल्याचे त्यांना कळले. एक दिवस तिथेच थांबण्यापेक्षा कोकण फिरून येऊ असे त्या दोघांनी ठरवले. आणि त्याच रात्री ते रत्नागिरीला निघाले.

रत्नागिरी , समुद्र किनाऱ्यावरचे सुंदर आणि आकर्षित करणारे गाव. सुधीर आणि राहुलने दोन दिवस अगदी मजेत घालवले. कोकणी पदार्थ, कोकणी किल्ले, लाइटहाउस, बीच, सगळं फिरून झाल्यावर आता गोव्याकडे जाण्यासाठी निघायचे होते. त्यांनी एक कार किरायाने घ्यायचे ठरवले आणि कारनेच गोव्याचा प्रवास करायचे ठरवले. मस्त हवा, गाणे आणि प्रवास. सुट्टी घ्यायचा निर्णय किती योग्य होता हे सुधीरला क्षणोक्षणी जाणवत होते. त्याचा सगळा थकवा दूर कुठे तरी पळून गेल्यासारखा वाटत होता. प्रवासाची दगदग होतीच पण त्यातही वेगळी मजा होती. त्याचा शीण शरीराला जाणवत नव्हता. आणि ह्या सुंदर प्रवासात मनाला मिळणारी शांतता काही औरच होती.

रमत गमत ते कणकवलीच्या पुढे आले. गावापासून बरच लांब अंतरावर असलेले एक हॉटेल त्यांना दिसले. रात्रीचे 10 वाजले होते आणि दोघांनाही थोड़ी थोड़ी भूक लागली होती. इथे जेवण करून आजची रात्र मुक्काम करावा असं ठरवून दोघेही हॉटेलच्या दिशेने गेले. सामान व्यवस्थित खोलीत ठेऊन दोघे जेवायला गेले. जेवताना थोडीफार चर्चा झाली. आणि उद्याच्या दिनक्रमाची यादी करायचं ठरलं. जेवण करून दोघे त्यांच्या खोलीत आले. खोली फारशी मोठी नव्हती पण गरजेच्या वस्तु होत्या तिथे. हॉटेल थोडं गावाबाहेर होतं म्हणून साहजिक गर्दी कमीच होती. उद्याच्या कामांची चर्चा करून यादी बनवायची होती. पण थकलेल्या शरीरापुढे कोणाचं चालतं??? दिवसभराचा थकवा होता त्यामुळे गादीवर बसल्याक्षणी दोघेही झोपेच्या आधीन गेले.

सकाळी सुधीरला जाग आली ती, त्याच्या भोवताली असणाऱ्या लोकांच्या आवाजामुळे. सुधीरला त्याचं डोकं खुप जड वाटत होतं. असं वाटत होतं तो कितीतरी दिवसांनंतर झोपेतून उठत होता. डोळे उघडून आजुबाजूला पाहिल्यानंतर त्याचा त्याच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. तो कोणत्याही हॉटेलमधे नव्हता. रस्त्याच्या कडेला झोपला होता आणि म्हणून लोकांनी त्याच्या भोवताली गर्दी केली होती. काय झालं होतं हे समजण्याच्या आत त्याचे डोळे राहुलला

शोधत होते. सुधीर होता तिथून थोड्या अंतरावर राहुल झोपला होता. लोकांच्या गर्दीतून बाहेर येऊन तो राहुल जवळ पळत गेला आणि त्याने हलवून राहुलला जागें करण्याचा प्रयत्न केला. थोड्या वेळाच्या प्रयत्नानंतर त्याला यश आले.

दोघेही वेड्यासारखे फक्त एकमेकांकडेच पाहत होते. झाल्याप्रकाराने दोघांचीही वाचा गेली होती. आजुबाजूच्या लोकांनी त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. पण काल रात्री एखाद्या हॉटेलमधे झोपलेली माणसे जर सकाळी रस्त्यावर उठली तर त्यांचं डोकं कसं ठिकाणावर राहील????

दुपारनंतर त्यांची अवस्था थोडी ठीक झाली. मग ते लोकांना विचारपुस करू लागले. त्यांनी विषय काढला त्याच क्षणी लोकांनी बोलणे चालु केले, असं वाटत होतं ते लोक ह्याच गोष्टीची वाट पाहत होते की कधी सुधीर त्यांना हे प्रकरण विचारणार.

"खुप वर्षांपूर्वी म्हणजे इंग्रज होते, तेव्हा या गावात एक वैद्य होते. त्यांची मुलगी होती रत्नावली. खुप हुशार आणि सुंदर होती ती दिसायला. गावात कोणालाही काही गरज पडली तर ती लगेच धावून जायची. निर्मळ मनाची होती खुप. शिक्षणात सुद्धा पारंगत होती. इंग्रजीही यायची तिला.

पण तिचं प्रेम होतं एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मुलावर. पीटरलाही रत्ना आवडत होती. तो इथेच लहानाचा मोठा झाला होता, म्हणून त्याला भारतीय लोकांबद्दल वेगळी सहानुभूती होती. त्यात त्याची ओळख सुंदर , हुशार रत्नासोबत झाली आणि हळू हळू त्यालाही ती आवडायला लागली. ही गोष्ट जेव्हा पिटरच्या वडीलांना कळाली तेव्हा त्यांनी रत्नावलीच्या सगळ्या कुटुंबाला कारागृहात पाठवण्याचे आदेश दिले. हे ऐकून पीटर घरातून पळून गेला आणि रत्नावलीच्या घरच्यांना घेऊन एका हॉटेलमधे लपून बसला. ते हॉटेल खास इंग्रज अधिकाऱ्यांच्या सोईसाठी बनवलेलं होतं. हळू हळू ही बातमी गावात पसरली सगळ्या गावकऱ्यामधे भीतीचं वातावरण निर्माण झालं. त्यात पीटरच्या वडिलांनी गावकऱ्याना बजावून सांगितलं. उद्यापर्यन्त जर रत्नावली आणि तिच्या घरचे सापडले नाहीत तर सगळं गाव उध्वस्त होईल. हे ऐकून गावकरी संतापले. आधीच इंग्रज काय कमी अन्याय करायचे??? त्यात ही नवीन भर. गावकऱ्यांनी सगळं गाव शोधलं. नातेवाईक, मित्र मंडळी एक ना एक घर पिंजून काढला पण त्यांना रत्नावली सापडली नाही.

संध्याकाळ होत आली तेव्हा त्यांना बातमी कळाली की ते सर्व गावाबाहेरच्या होटेल मधे लपून बसले आहेत. इथे त्यांच्यामुळे अख्ख गाव उध्वस्त होईल आणि ते लपून बसले आहेत असं म्हणून गावकऱ्यांनी रागाच्या भरात येऊन त्या हॉटेलला आग लावली. आणि रत्नावली आणि पीटर तिच्या कुटुंबासोबत जळून मेली. तो दिवस अष्टमीचा होता. तेव्हा पासून प्रत्येक अष्टमीला इथे ते हॉटेल दिसतं. रात्रीच्या अंधारात लोकांना बहुधा ते होटेल खरं भासत असावं. ते रात्री तिथे मुक्काम करतात आणि आम्हाला दुसऱ्या दिवशी रस्त्यावर भेटतात. तुमच्याच सारखे ते भांबावलेले असतात. "

ही कथा ऐकून सुधीर आणि राहुल घाबरले नाहीत पण उलट त्यांचा उत्साह वाढला... नाही तरी ते एका भन्नाट कथेच्याच शोधात होते. त्यांनी पुढच्या अष्टमीपर्यन्त रहायचा निर्णय घेतला. सामान वगेरे सगळंच ते गमवून बसले होते. आणि आता एवढे दिवस राहायचं तर कपडे लागणारच. राहुलने तिथे गावात त्यांच्या रहाण्याची सोय केली आणि तो पर्यन्त सुधीरने जवळपासच्या बाजारातून त्या दोघांसाठी खरेदी केली. सामानाच्या बैगमधे पैसे ठेवले नव्हते हे बरच झालं.

अष्टमी पर्यन्त सुधीरने बरीच माहिती मिळवली. रत्नावली आणि पीटर संबंधीचे मिळतील तेवढे पुरावे आणि माहिती त्याने साठवली. काम थोडं कठीणच होतं पण आवश्यक होतं कारण आता त्या हॉटेलमधे जर ती दोघं भेटली तर त्यांना विचारायचे सगळे प्रश्न सुधीरकडे असायला हवे होते. जसं जसं तो ही माहिती मिळवत होता, त्याचे रत्नावली बद्दलचे आकर्षण वाढत होते. मुळात रत्नावलीने चुकीच्या वेळेत जन्म घेतला होता. खरं तर ती एकविसाव्या शतकातील होतकरु स्त्री होती पण आधी जन्म घेतल्यामुळे कित्येक अशा बंधनात अडकली होती. पीटरही खुप चांगला होता. पाश्चात्य संस्कृतीचा थोडाही प्रभाव त्याच्यावर नव्हता. भारतात जन्मलेला एखादा भारतीयचं जणु. असे विचार सुधीरच्या मनात येत होते.

आज अष्टमी. आज दोघे परत त्याच वाटेने प्रवास करणार होते. पण आज ते त्या हॉटेलमधे फक्त जाणार होते, झोपणार नव्हते. आजची रात्र काहीतरी रहस्यमय असणार म्हणून दोघेही उत्सुक होते. अष्टमीच्या दिवशी नेहमी प्रमाणे सूर्यास्तानंतर कोणीही घराबाहेर पाऊल टाकला नाही. सगळे रस्ते सुनसान झाले. बरोबर 10 वाजता राहुल आणि सुधीर त्या हॉटेल समोर आले. आता मात्र उत्साहाची जागा थोडयाशा भीतीने घेतली. दोन्ही डोळे एकदा घट्ट मिटुन दोघांनी

हॉटेलमधे प्रवेश केला. दोघांनी रूम बुक केली. या वेळेस रूम बुक करणारा माणुस वेगळाच होता. त्या माणसाने दोघांना जेवणाची विचारणा केली. पण सुधीरने नकार दिला आणि मग दोघेही खोलीत गेले. अर्धी रात्र उलटून गेली तरी कसलीच हालचाल नव्हती. सुधीरला आता तहान लागली होती. खोलीत एका कोपऱ्यामधे पाण्याचा जग होता. तो पाहून सुधीरला थोडे हायसे वाटले. पाणी पिऊन तो पुन्हा जागेवर येऊन बसला.

" राहुल, कुठेच काही हालचाल दिसत नाहिये. खोलीतून बाहेर पडायलाही भीती वाटत आहे. ही भूतं चांगली असतील नाही का?? कोणालाही हानी पोहचवत नाहीत. " सुधीर.

" सुधीर सर, तुम्हाला तर तुमचे शत्रु देखील चांगले च वाटतात. मग हे भूत तुम्हाला चांगले वाटतील ह्यात शंकाच नाही. " राहुल.

" तसं नाही रे राहुल, पण बघ ना कित्येक प्रवासी ह्या मार्गाने जात असतील आणि इथे विसावाही घेत असतील. पण कोणाचं नुकसान हे लोक करत नाहीत. किती निर्दयी असतील ते लोक ज्यांनी ह्या निष्पाप माणसांना जिवंत जाळलं. " सुधीर.

" तुम्हाला काय वाटत सर, एवढ्या वर्षांनी त्यांच्या कोणत्या इच्छा अपूर्ण असतील म्हणून ते फक्त अष्टमीला प्रकट होतात. आणि लोकांनी त्यांच्या सोबत जे केलं त्यानंतर त्यांच्या मनात सुड, प्रतिशोध, तिरस्कार या भावना नसतील???" राहुल.

"………. "

" सर.... ??? सुधीर सर????"

सुधीरला त्यानंतर सकाळीच जाग आली. पुन्हा तीच गडबड , लोकांची कुजबुज. सुधीर शुद्धिवर आला. नेहमीप्रमाणे त्याचे डोळे राहुलला शोधत होते. आणि राहुलला पाहून त्याने आर्त हाक मारली पण प्राण जाऊन निपचित पडलेला माणूस कितीही प्रेमाने हृदयाच्या खोलातून हाक मारली तरीही उठत नाही. हो, राहुलचे प्राण गेले होते. काही वेळा करता सुन्न झालेल्या सुधीरला आता लोकांचे बोलणे ऐकू येत होते किंबहुना जरा जास्तच स्पष्ट ऐकू येत होते.

गावातील लोक ह्या दोघांच्या वेडेपणावर आधी फक्त हसत होती पण आता त्यांना दोष देत होती. सुधीरकडे पाहून त्याची मानसिक स्तिथी कशी योग्य नाही हे एकमेकांना सांगत होती. भूत पाहून वेडाच्या भरात सुधीरने राहुलचा खून केला असं काहिसं बरळत होती.

" काय?? नाही??? मी राहुलचा खून केला नाही. शक्यच नाही. मला फक्त झोप लागली होती. मी.. मी काहीच केलं नाही. "

लोकांची बोलणी ऐकून तो एकटाच चार बाजूंनी फिरून सगळ्यांना पटवून देत होता की त्याने खून केला नाही. या स्थितीमधे तर तो खरंच वेडा वाटत होता. गावकऱ्यांनी पहिल्यांदाच खून पाहिला होता. त्यामुळे प्रत्येकाला काहीतरी सिनेमा पाहिल्याचा अनुभव वाटत होता. कोणी तरी पोलिसांना फोन केला.

पोलिसांनी घटनास्थळावरील माहितीवरून सुधीरला अटक केली. पण ही अशी अष्टमीला प्रकट होणाऱ्या हॉटेलची कथा पोलिसांना कितपत पटणार होती?? तो वेडाच वाटत होता. तरीही त्याच्यावर दया म्हणून पोलिसांनी त्याला ओळखीच्या व्यक्तीला फोन करण्याची परवानगी दिली.

गोव्याला सुधीर ज्या मित्राकडे जाणार होता त्या शशांकला सुधीरने फ़ोन केला.

" शशांक , मी सुधीर बोलतोय. "

" सुधीर अरे कुठे आहेस तू?? तुझा मेल मिळाला होता की तू येणार आहेस पण आता पर्यन्त तू इथे असायला हवं होतं. तुझा फोनही लागत नाहियेे???"

" शशांक, या वेळेस काही प्रश्न विचारू नको. मी सांगतो त्या पत्त्यावर ताबडतोब ये. मी खुप मोठ्या अड़चनीत आहे. "

शशांक लगेच गाडी घेऊन कणकवलीला निघाला. एवढ्या वर्षानंतर तो सुधीरला पाहणार होता. देव जाणे तो कोणत्या अडचणीत होता. शशांकचं डोक पूर्ण रस्त्यामधे काळजीने घेरलेलं होतं. शशांकला आजही स्पष्ट आठवत होतं. लहानपणापासून सुधीरचा स्वभाव खुपच वेगळा होता. सुधीरच्या आजी आजोबांच्या घराशेजारीच शशांकच घर होतं. सुट्टीला आल्यावर सुधीर नेहमी शशांक बरोबर असायचा. त्याची कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याची दृष्टीच वेगळी होती. स्वतः हून एखाद्या संकटात स्वतः ला कोणी कसं अडकवतं हे त्याच्याकडे पाहून कळतं. आजही एवढ्या वर्षांनंतर तो अगदी तसाच आहे. लहानपनीच्या काही गोष्टी आयुष्यभर आपल्या सोबत राहतात त्या ह्या अशा. आज त्याने न जाणो कोणतं संकट स्वतः वर ओढवून घेतलं आहे.

शशांक विचार करता करता कणकवलीच्या पोलिस स्टेशनला पोहोचला. सुधीरला पाहून त्याला नेमकं काय वाटलं पाहिजे ह्याचा गोंधळ त्याच्या चेहेऱ्यावर दिसत होता. एवढ्या वर्षांनी पाहतोय म्हणून आनंद की संकटात आहे त्याचं दुःख. दोघांच्याही डोळ्यात क्षणभरासाठी अश्रु तरळले. सुधीरने थोड्या वेळात शशांकला शांतपणे सगळं अगदी सविस्तर सांगितलं. हे ऐकून प्रथम कोणाचाही विश्वास बसणे अशक्यच. पण सुधीर निश्चितच मनोरुग्न नव्हता. त्यामुळे तो सत्य सांगत होता यावर शशांकचा विश्वास होता.

" खरंच हे असं सगळं सांगितलं तर कोणाचाही विश्वास बसणार नाहीच सुध्या.. तुझी स्वतःहून संकटांना आमंत्रण द्यायची सवय बघ आज कुठे घेऊन आली आहे. मी एक मित्र आहे म्हणून तुझ्यावर विश्वास ठेवेन पण जगाचं काय???"

" असं बोलू नकोस मित्रा. आधीच राहुलच्या जाण्याचा धक्का पचवु शकत नाहिये त्यात इथून बाहेर पडण्याचे मार्गही अंधारात दिसत असतील तर जगण्याची आशाच सोडावी लागेल. "

" नाही सुध्या. अरे मी फक्त तुला परिस्थिती बद्दल माझं मत देत होतो. तुला यातून बाहेर काढण्यासाठी मी वाट्टेल ते प्रयत्न करेन. आपल्या मैत्रीची शप्पथ!!!"

" पण या आधी आपल्याला चांगला वकील लागेल. आहे कोणी तुझ्या माहितीमधे??? मला कोर्टात नेण्यासाठी आणखी आठ दिवस बाकी आहेत त्या आधी माझी काही तरी सुटका होते का बघ. किती दिवस आता कोर्टाची वारी करावी लागणार देव जाने. "

" अरे हो... अगदी बरोबर.. देवच आपल्याला सांगू शकतो आणि आपली मदतही करू शकतो. खरंच हुशार आहेस तू... "

" वेडा आहेस का शशांक की काही परिणाम झालाय देव सांगेल का तुला???"

" अरे माझ्या माहितीत एक वकील आहे. देव पटवर्धन. मागच्याच वर्षी त्याचे किस्से ऐकलेत मी. भारी कॅरेक्टर आहे. खुप हुशार वकील आहे. विचित्र केसेस सोडवण्यात त्याचा हातखंडा आहे. "

" असं असेल तर मग वेळ घालवु नकोस लवकरात लवकर त्याला बोलावून घे. "

" हो, असचं करतो. मी निघतो आता तू तुझी काळजी घे. बाकी माझ्यावर सोड. "

पणजीला जायचं म्हणून देव खुपचं खुश होता. मागे त्याच्या एका ओळखीतल्या लग्नासाठी तो गोव्याला गेला होता पण आता त्या गोष्टीला 4 वर्षे उलटून गेली होती. गोव्याच्या त्या निसर्गरम्य वातावरणाची त्याला उत्सुकता वाटत होती. शिवाय आशीष सोबत असणारच होता. त्यामुळे त्याला धमाल करायला भेटेल यात शंका नव्हती. केस काय होती, हे अजून पर्यन्त दोघांनाही माहिती नव्हतं पण फक्त ओळखीच्या जोरावरच ते मदत करायला निघाले होते. नाही तरी देवसाठी कोणती केस अशक्य होती?.

" आशीष, हे शशांक म्हणजे मागच्या वर्षी आपल्याला नाईकांकडे भेटले ते सभ्य आणि सुशिक्षित, तेच ना??" देव.

" हो, बरोबर आहे तुझं देव. सभ्य आणि सुशिक्षित अगदी असचं म्हणाला होतास तू त्यांना पाहिल्यावर. पण त्यांना आपली कधी गरज पडेल असं वाटलं नव्हतं. बाकी काही म्हण देव, या नाईक वकिलांमुळे आपल्याला बऱ्याच केसेस भेटल्या आहेत. " आशीष.

" हो ना. का कुणास ठाऊक त्यांना आपलं खुप कौतुक वाटतं. " देव.

" झाली का तयारी??आज रात्री निघायचं आहे. " आशीष.

"हो. झाली आहे सगळी तयारी. फक्त हायकोर्टची काळजी वाटते. " देव.

" तुझी खरी कमालच आहे हा देव. कुत्र्याचं नाव कोणी हायकोर्ट ठेवतं का??" आशीष.

" अरे असुदे रे.... तो मला हायकोर्टाच्या बाहेर भेटला म्हणून ठेवलं आहे मी ते नाव. आणि वकीलाच्या कुत्र्याला यापेक्षा काय चांगलं नाव भेटणार?" देव.

" तुझा खुपच जीव आहे ना हायकोर्ट वर?" आशीष.

" हो. तो आहेच तसा. भेटला तेव्हा खुप लहान होता. आपल्यासारखाच एकटा. माझ्यासाठी तू आहेस आणि तुझ्यासाठी मी. पण त्या बिचाऱ्याचं अगदी कोणीसुद्धा नव्हतं. मी सलग 5 दिवस त्याला कोर्टाबाहेर असं हतबल पाहिलं. त्याचं दुःख आपल्याला नाही तर कोणाला समजणार?? त्याची हुशारी पाहून मी त्याला ट्रेनिंग सेंटरला पाठवलं. सगळ्या प्रकारच्या संकटात आता तो आपली मदत करू शकतो. " देव.

" देवा, अरे आपण त्याला घेऊन जाऊया का? आपल्याला माहिती नाही, तिकडे काय परिस्थिती आहे. झालीच तर त्याची मदतच होईल. " आशीष.

" हो. बरोबर आहे तुझं. त्याला एकट्याला सोडून मी एवढं दूर कुठे गेलो नाही म्हणून माझंही मन त्याला सोडून जायला धजावत नव्हतं. जाऊया त्याला घेऊन. " देव.

सगळी तयारी करून देव आणि आशीष हायकोर्टला बरोबर घेऊन निघाले. हायकोर्ट म्हणजे सोनेरी रंगाचा, गुबगुबित लैब्राडोर प्रजातीचा हुशार कुत्रा होता. त्याला मिळालेल्या ट्रेनिंगमुळे तो पोलीस, अंधव्यक्ती सगळ्यांना मदत करू शकत होता. आणि आजपर्यन्त त्याने खुप लोकांना मदत केली होती. आशीषलाही त्याने बऱ्याच केसेस मधे मदत केली होती. त्यामुळे आताही त्याला बरोबर घेऊन जाणे त्यांना फायदेशीर ठरणार होते.

पणजीला शशांकने सांगितलेल्या पत्त्यावर ते पोहोचले. प्रशस्त असं सुंदर, नारळाच्या झाडांनी भरलेलं अंगण, दुरवर समुद्रकिनारा नजरेस पडेल असं घर होतं. काही वेळ विश्रांती केल्यानंतर त्यांनी शशांकला बोलायला सुरुवात केली.

" सांगा शशांक, काय केस आहे. " देव.

" देवसाहेब, पहिले तर मी तुमचे मनापासून आभार मानतो. एका फोनवर तुम्ही मला मदत करायला धावून आलात. तुमचे आभार व्यक्त करावे तेवढे कमीच. " शशांक.

" आभारच व्यक्त करायचे असतील तर मला एकेरी नावाने हाक मारा. बाकी मदतीचं म्हणाल तर तो माझा पेशा आहे आणि जगण्याचे कारण सुद्धा. यातही माझाच स्वार्थ आहे. " देव.

" तूझं मन खुप मोठं आहे. तर केस अशी आहे की माझा लहानपणीचा मित्र एक महिन्यापुर्वी अमेरिकेहून भारतात आला आणि नको त्या अडचणीत सापडला. खुप चांगला लेखक आहे तो. कथेच्या शोधात बाहेर पड़ला आणि...... "

शशांकने झालेला सगळा प्रकार देवला व्यवस्थित समजावून सांगितला. सुधीरने सांगितलेली एक ना एक लहान मोठी गोष्ट त्याने जशास तशी सांगितली. हा सगळा प्रकार ऐकून देव आणि आशीषच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. केसचं वेगळेपण त्यांना जाणवत होतं आणि इथे आल्याचं समाधान दोघांच्या डोळ्यात तरळत होतं. देवने सगळं ऐकून घेतल्यावर बोलायला सुरुवात केली.

" केस खुपचं वेगळी आहे पण आम्ही ती नक्कीच सोडवू शकतो. तरीही या सगळ्या आधी मी तुम्हाला एक प्रश्न विचारु इच्छितो, तुम्हाला आमच्यावर विश्वास आहे का, की ही केस आम्ही सोडवणार?" देव.

" हो नक्कीच. म्हणून तर आणखी कोणाकडेही न जाता मी पहिला फोन आशीषला केला. तुम्हीच फक्त माझ्या मित्राला यातून वाचवु शकता. " शशांक.

" मग ठीक आहे, कारण तुमचा माझ्यावर विश्वास असणे खुप महत्त्वाचे आहे. तर आता मी तुम्हाला माझ्या काम करण्याची पद्धत सांगतो. तुम्ही म्हणताय म्हणून तुमचा मित्र निर्दोष सिध्द होत नाही , ही गोष्ट मी स्वतः पड़ताळून पाहणार. आणि तो निर्दोष असला तर आणि तरच मी त्याला यातून वाचवणार. पण तुमचे बोलणे ऐकून तरी मला तुमचा मित्र निर्दोषच वाटत आहे. "

" मला तुमच्या सगळ्या अटी मान्य आहेत. " शशांक.

" ठीक आहे, आम्ही निघतो मग आता त्या हॉटेलच्या दिशेने. " देव.

आशीषने एक कार किरायाने घेतली. त्यात त्याचं सगळं सामान आणि हायकोर्टला घेऊन ते निघाले. गावात न राहाण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. त्यामुळे त्याहॉटेल पासून थोड्या अंतरावर त्यांनी एक टेंट उभारला. दिवसभर ते गावात वेशांतर करून फिरू लागले. गावकऱ्यांकडून घडलेल्या घटनेची चौकशी करु लागले. खुप प्रयत्न केल्यानंतरसुद्धा त्यांच्या हाती काही आलं नाही.

दोन दिवसांनंतर देवने आशीषला गावातील लोकांबद्दल माहीती गोळा करायला सांगितली. आणि तो स्वतः सुधीरला भेटायला गेला.

" नमस्कार सुधीर, मी देव पटवर्धन. तुमचा वकील. मला तुम्हाला काही महत्त्वाचे प्रश्न विचारायचे आहेत. " देव.

" विचारा वकीलसाहेब, मी अगदी खरं सांगेन पण मला वाचवा. मला आता इथे कोठडीत राहायचं नाहिये. " सुधीर.

" शांत व्हा. मला सविस्तर सगळं सांगा. आणि घाबरु नका. " देव.

सुधीरला बोलल्यानंतर जाता जाता देवने इंस्पेक्टर महालेची पण भेट घेतली. देवला स्वतःची ओळख पटवून द्यायला फारसा अवधी लागला नाही. देवने सोडवलेल्या काही केसेस आणि त्या केसवर असणारे इंस्पेक्टर यांची नावे सांगितल्यावर इंस्पेक्टर महालेंना देव कोण आहे आणि तो काय करू शकतो याची जाणीव झाली. त्याला हवी ती मदत आणि सहकार्य करण्याचे त्यांनी कबूल केले. देवने आतापर्यन्तच्या चोरीच्या केसेसची फाइल महालेंकडून घेतली आणि सोबतच राहुलच्या पोस्ट मार्टमची फाइल, सुधीरच्या विरोधात असलेले सगळे पुरावे, घटनास्थळावर उपस्थित साक्षीदारांची यादी या गोष्टीही घेतल्या.

सुधीरला सगळ्या शंका विचारल्यानंतर देव परत आला. आता त्याच्याकड़े फक्त दोन दिवस उरले होते. त्यानंतर मात्र हे प्रकरण कोर्टात जाणार होतं. आणि देवच्या आतापर्यन्तच्या कारकिर्दीत असं पहिल्यांदाच झालं होतं की केस हातात घेऊन आजचा तिसरा दिवस उजाडला आणि त्याला गुन्हेगाराचा अजून पत्ता लागला नव्हता. पण म्हणून तो काही हार मानणार नव्हता. त्याच्या हातात आता त्याला हवी असणारी जवळपास सगळी माहीती होती. उर्वरित माहिति त्याला आशीष कडून कळणार होती. आता त्याला गरज होती ती फक्त शांत चित्ताने विचार करायची. राहुल हायकोर्टला घेऊन गावात फेरफटका मारायला गेला होता त्यामुळे सध्या तरी टेंट मधे देव एकटाच होता. त्याने थोडा वेळ डोळे मिटुन शांत ध्यानधारना केली. घडलेल्या गोष्टींचा घटनाक्रम जुळवण्याचा प्रयत्न केला. शक्य -अशक्य गोष्टींचा विचार केला. हळू हळू त्याला काही धागे दोरे मिळत होते. आणि अचानक त्याला एक कल्पना सुचली.

ही कल्पना त्याला हवी तशी सत्यात उतरली तर उद्या संध्याकाळ पर्यन्त या प्रश्नाची उकल होणार होती. आशिष थोड्यावेळात परत आला. त्याच्या चेहेऱ्यावरचे हावभाव पाहून त्याला हवी ती माहिती मिळाली होती हे स्पष्ट दिसत होतं. आणि देवचा चेहेराही खुलला होता. दोघेही एकमेकांकडे जणु खजिना सापडला अश्या नजरेनी पाहत होते.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सगळा गाव बाजारपेठेत जमला होता. माणसांनी भरलेल्या एका मोठ्या मैदानावर इंस्पेक्टर महालेंनी गावातल्या चार मुलांना हातात बेडया ठोकल्या होत्या. देव आणि आशिष दोघेही सुधीरकडे पाहून स्मितहास्य करत होते. सुधीर आणि शशांक दोघेही चकित झाले होते. सुधीरने तर आशाच सोडून दिली होती. पण देवने शेवटी या सगळ्याचा छड़ा लावला होता. खऱ्या गुन्हेगारांना पुराव्यानिशी पकडून त्याने इंस्पेक्टर महालेंच्या हवाली केलं होतं. त्यामुळे इंस्पेक्टरला सुधीरची निर्दोष सुटका करावी लागली. गुन्हेगारांनीही सगळ्या गावासमोर आपल्या गुन्ह्याची कबूली दिली.

" वकीलसाहेब, तुमच्याबद्दल ऐकलं होतं अगदी तसचं झालं. चार दिवसात तुम्ही सुधीरची सुटका केली. पण हे सगळं तुम्ही कसं केलं??? भुत आणि अदृश्य होणाऱ्या हॉटेलच नाव ऐकून तर मला काही सुचतच नव्हतं. सुधीरची सुटका तुम्ही कशी करणार हे मला कळतंच नव्हतं. " शशांक.

" हो हो देव साहेब, आम्हालाही सांगा. तुम्ही गुन्हेगाराला पकडलं कसं??" इंस्पेक्टर.

" हो. सांगतो. मी आणि आशिष दोघेही या गावाच्या बाहेर टेंट करून राहत होतो. त्यामुळे गावातल्या लोकांना आमच्या बद्दल काही माहिती नव्हती. आम्ही मात्र दोन दिवस वेशांतर करून गावातल्या लोकांवर नजर ठेवली. मुळात माझा ह्या दंतकथांवर कधीच विश्वास बसला नाही त्यामुळे माझ्या मनात संशय होता तो गावकऱ्यांबद्दलचा. अदृश्य होटेल वगेरे सगळं ठीक आहे पण हे भुत सामान कशाला घेत असतील ही गोष्ट लक्ष वेधणारी होती. गावातील चोरीच्या केसेस खुप प्रमाणात होत्या.

आशीषने काढलेल्या माहितीवरून मी सगळ्यांचा आढावा घेतला. त्यात मला बाकी साऱ्या गावच्या मंडळीचा काही दोष सापडत नव्हता पण संशयाची पाल चूकचुकत होती ती या चार पोरांभोवती.

ही चार मुले शिक्षण संपवून 10 वर्षे झाली गावातच आहेत. महिन्यातील फक्त आठ दिवस हे शहरात जातात आणि कमवून येतात. बाकी महीनाभर गावातच असतात. ह्यांच शिक्षणही जेमतेम आणि लहानपणापासूनची मैत्री. कुठे तरी काळंबेरं वाटत होतं. मला ही चार मुले काय करत असावीत याचा अंदाज आला. आणि मला गुन्हेगारांची ओळख पटली. पण माझ्याकडे निश्चित पुरावे नव्हते. मग मी सुधीरला भेटायला गेलो आणि सगळं धुकं झटक्यात दूर झालं. आता मी ह्यांना कसं पकडलं हे सांगण्याआधी मला वाटतं त्यांना त्यांची बाजू सांगु द्यावी. " देव.

" बोला रे पटापट. " असं म्हणत इंस्पेक्टर महालेंनी चारही जणांच्या डोक्यात एक एक फटका मारला.

" सांगतो. ही सगळी माझी चूक आहे. " मंदार हा त्यांच्यातला एक मुलगा होता त्याने बोलायला सुरुवात केली.

" मी मंदार. आणि हे माझे तीन मित्र. संतोष, मंगेश आणि सचिन. आम्ही लहानपणापासून एकत्रच वाढलो. पुढे शिक्षणासाठी शहरातही एकत्रच होतो. आमचं शिक्षण काही फार नव्हतं. आणि उच्चशिक्षण घ्यायला पैसेही नव्हते. मी तर लहानपणापासूनच अनाथ आहे. संतोष आणि मंगेशचे वडील शेतकरी तर सचिनच्या घरी पिठाची गिरणी. आम्ही शहरात आहोत म्हणल्यावर इथल्या लोकांना वाटत होतं आम्ही खुप पैसे कमवतो म्हणून मित्रांना त्यांच्या घरी पैसे पाठवावे लागत. पण शहरात आम्हाला आमचाच गुजारा करने मुश्किल झाले होते. काही दिवसांनी आम्ही सुट्टीला घरी आलो. तेव्हा मंगेशच्या आजीने आम्हाला त्या हॉटेलची गोष्ट सांगितली की खुप वर्षांआधीपर्यन्त म्हणजे आजीच्या लहानपणी लोकांना ते हॉटेल दिसत होतं अशी कथा होती.

आणि मला एक कल्पना सुचली. ते हॉटेल परत लोकांना दिसु शकतं. आणि आम्ही एक चालतं फिरतं हॉटेल बनवलं जे एका रात्रीमधे आम्ही ते उभारू शकु आणि सकाळी काढू शकु. गावाच्या बाहेर एक जागा होती. तिथे रात्री साधा उजेडही पडत नसे. आणि आम्ही याचाच वापर केला.

जे कोणी आमच्याकडे यायचे त्यांच्या जेवणात आणि पाण्यात आम्ही गुंगीचे औषध मिसळत होतो आणि नंतर पैसे आणि सामान चोरून त्यांना रस्त्यावर सोडत होतो. सकाळी लोकांना वाटले की ते हॉटेल परत दिसत आहे आणि लोकांच सामानही होटेलसोबतच गायब होत आहे. शंका येऊ नये म्हणून आम्ही फक्त अष्टमीलाच दिसायचं असं ठरवलं आणि एका वेळेस एकाच कुटुंबाला होटेलमधे प्रवेश द्यायचो. गावातल्या लोकांनीही ती कथा चोरी झालेल्या प्रवाश्यांना सांगायला सुरुवात केली. सामान गेलं तर गेलं जीव तरी वाचला असं म्हणून ते लोक पळून जायचे. आमचं काम झालं होतं. आम्हाला पैसा मिळत होता. पण त्या दिवशी.... "

देवने मधेच त्याला थांबवत बोलायला सुरुवात केली.

" हा..... त्या दिवशी सुधीर आणि राहुलने इथे थांबायचा निर्णय घेतला. आणि हे चार मित्र घाबरले. त्यांनी हर प्रकारे त्याचं मन वळवायचा प्रयत्न केला. ही गोष्ट मला सुधीर कडून कळाली. सुधीरकडून मी तो या गावात आल्यापासुन त्याला कोण कोण भेटले होते याची तपशीलवार माहिती घेतली त्यानंतर मला खात्री पटली.

राहुल जवळच्या सामानामधे मला एक शर्टचा तुकड़ा भेटला. माझं काम तिथेच झालेलं होतं. मला पुरावा मिळाला. आता गरज होती ते फक्त तो शर्ट कोणाचा आहे हे शोधण्याची. म्हणून सगळा गाव एकत्र करण्यासाठी आम्ही जोतिषाचा वेश धारण करून सगळ्यांना आशीर्वाद देण्याचे नाटक केले. इथे येणाऱ्या प्रत्येक माणसाला हायकोर्ट निरखुन पाहत होता. हायकोर्ट म्हणजे हा माझा लाडका कुत्रा. त्याला मी आधीच त्या शर्टच्या तुकड्याचा वास दिला होता. ह्या चार मित्रांना इथे बोलवण्यासाठी आम्ही मंगेशच्याच आजीचा वापर केला. त्या आजींना आम्ही पटवून दिले की आम्ही खुप मोठे ज्योतिषी आहोत आणि ह्या गावातला अदृश्य होटेलचा जो काही प्रश्न आहे तो आम्ही निश्चित सोडवणार. मला खात्री होती हे ऐकून आम्हाला पाहायला ही चार मित्र मंडळी नक्कीच येणार. ह्या चार मित्रामधला सचिन समोर आला आणि हायकोर्टने इशारा केला. त्यारात्री राहुलने सचिनला ओळखले होते आणि म्हणून सत्य लपवण्यासाठी सचिनने खून केला.

ह्या सगळ्याची कल्पना मी इंस्पेक्टर महालेंना आधीच दिली होती. त्यांना फक्त सिद्ध करून दाखवायचे होते की खरा गुन्हेगार कोण ते. आणि बरं का इंस्पेक्टर, मी तुम्हाला पुराव्यानिशी आणि गुन्हेगाराच्या कबूलीजबाबासकट सिद्ध करून दाखवलय. "

"हो, नक्कीच तुम्ही मला भेटून गेल्यानंतर मी माझ्या सहकार्यांकडून तुमच्याबद्दल बरच ऐकले. आणि मला ही खात्री होतीच की तुम्ही सुधीरचं वकिलपत्र घेतलं म्हणजे तो नक्कीच निर्दोष आहे. " इंस्पेक्टरनेही लगेचच कौतुकाची थाप दिली.

सुधीरला तर आनंद गगनात मावेनासा झाला. कुठे तो एका कथेच्या शोधात आला आणि स्वतः च एक पात्र बनून राहिला. देवमुळे आज तो कोठडीतुन बाहेर पडून मोकळ्या हवेत श्वास घेऊ शकत होता. त्याने देवचे खुप आभार मानले.

देवने सगळ्यांचा निरोप घेतला आणि हायकोर्ट आणि आशिषकडे विजय प्राप्त झाल्याचा कटाक्ष टाकला. आणि ते तिघेही निघाले.

" आशिष, भन्नाट केस होती ना ही.. ? माझ्याजागी दुसरा कोणी असता तर एवढ्या लवकर कधीच केस सोडवू शकला नसता. काय बरोबर ना?" देव.

" आम्हीही काम केलंय म्हणलं.. तुझ्या स्वस्तुतीमधून वेळ मिळाला तर आमचीही आठवण ठेव. ऐकतोय का रे हायकोर्ट, आपल्याला बहुधा प्रशंसेची चव चाखायला मिळणारच नाहीये. सगळीकडे फक्त देवच दिसतोय. " आशीष.

" असं कसं होईल? भक्तांशिवाय देव कसा असेल ? हा हा हा.... पण खरंच हायकोर्टला बरोबर आणण्याचा निर्णय अगदी योग्य होता. खरा गुन्हेगार तर त्यानेच शोधला आहे. तू तर प्रत्येक केस मधेच माझ्यासाठी हुकुमाचा एक्का ठरतोस. " देव.

"बापरे एवढं कौतुक!!! पुरे आता. चला, एक सरप्राइज आपली वाट पाहत आहे. " आशीष.

" कसलं सरप्राइज?? " देव.

" ते पुण्याला गेल्यावरच कळेल. " आशीष.

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. प्राजक्ता देशपांडे यांचं हे दुसरं पुस्तक.**

प्राजक्ता देशपांडे या एक इंजिनियर. पण लेखनकला त्यांच्या रक्तात आली ती वडिलांकडून. खरे तर लेखक होणं त्यांच्या वडलांचं स्वप्न. पण अनेकांना त्यांच्या ऐन उमेदीत प्रकाशक मिळत नाही. कारण लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. जर प्रकाशनच झाले नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता.

अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहोत. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत.

ई सा हि त्य प्र ति ष्ठा न

त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

शुभम पाटील, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी, प्राजक्ता देशपांडे, शुभम पाटील, सौरभ कोरगावकर, आशिष कर्ले, गणेश ढोले असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com